पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

14 वर्ष वर्धापन दिन

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३३६ ■ सोमवार, दि. १५ जून २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# पन्नास लाखांचा गुटखा पकडला मकोका का लावला नाही ?

## अन्न व औषध प्रशासन, पोलिसांचे वरिष्ठांच्या आदेशाकडे दूर्लक्ष



प्रतिनिधी १५ जून

**शेगाव :** पांढुर्णा मध्य प्रदेश येथून शेगाव येथे प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ घेऊन येणारा कंटेनर अन्न व औषध प्रशासन बुलढाणा पथकाने पकडल्याची घटना १३ जून रोजी रात्री १०. १० वाजता शेगाव, वरवट रोडवरील यादव बेकरी समोर घडली असून ७० लाख १३ हजार ९२० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आल्याने गुटका माफियात एकच खळबळ उडाली. या प्रकरणात पोलिसांनी मकोका (महाराष्ट्र नियंत्रण संघटित गुन्हेगारी कायदा) का लावला नाही अशी विचारणा आता होत आहे.

याबाबत प्राप्त माहिती अशी की गुलाबसिंग किंता वसावे, अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन (म. राज्य.), बुलढाणा हे पोलीस स्टाफ सह खाजगी वाहनाने पोलीस स्टेशन शेगाव शहर हद्दीत अवैद्य धंद्यावर रेड करने कामी पेट्रोलिंग करीत असताना अशोक लेलॅंड मालवाहक वाहन क्रमांक एम एच -४०, जीटी - २९६५ चा चालक सुरुर अहम्मद नूर अहमद वय ३७ वर्षे रा. अल्लाह मस्जिद जवळ, फिरदोस कॉलनी अकोला या आरोपींच्या ताब्यातून जुने वापरते अशोक लेलॅंड वाहन क्रमांक एम एच -४१-जीटी २९६५ कि. २० लाख रु असा एकूण ७० लाख १३ हजार ९२० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. या प्रकरणी गुलाबसिंग किंता वसावे अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन (म. राज्य.), बुलढाणा यांनी शहर पोलीस स्टेशन ला फिर्याद दिल्यावरून पोलिसांनी आरोपी अशोक लेलॅंड मालवाहक वाहन क्रमांक एम एच - ४०-जीटी - २९६५ चा चालक सुरुर अहम्मद नूर अहमद वय ३७ वर्षे रा. अल्लाह मस्जिद जवळ, फिरदोस कॉलनी, अकोला. तसेच सिध्देश्वर टोबॅको प्रोडक्ट प्रा.लि. छिंदवाडा (मध्यप्रदेश) या कंपनीचे मालक व भागीदार संचालक यांच्या विरोधात हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अकोल्यातील या ट्रक द्वारे अकोल्यात कोणाकडे माल पोहचविण्यात येत होता याचा ही शोध पोलिसांना घ्यावा लागेल. इतकेच नाही तर त्या आरोपीच्या विरोधात या पुर्वी या विषयाचे काही गुन्हे दाखल आहेत काय याची चौकशी करावी लागणार आहे. अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ चे ५९ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले असून पुढील तपास मा. पो. नि. सा. आदेशाने पो. उप. नि. कुणाल जाधव पो. स्टे शेगांव शहर यांचे कडे देण्यात आला.

### दाखल करण्यात आलेली मूळ कलमे

या गुन्ह्यात मानवी आरोग्याला घातक असणाऱ्या अन्नपदार्थांची / तंबाखूजन्य पदार्थांची अवैध वाहतूक आणि विक्री केल्याप्रकरणी खालील कलमे लावण्यात आली आहेत. भारतीय न्याय संहिता व अन्न सुरक्षा व मानके कायदा या आधारे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जर हा गुटखा/तंबाखू तस्करीचा गुन्हा एका संघटित टोळीद्वारे आर्थिक फायद्यासाठी वारंवार केला जात असेल, तर मकोका कायद्यानुसार गुन्हा दाखल होईल. संघटित गुन्हेगारी कृत्य करणे किंवा त्याला पाठबळ देणे. संघटित गुन्हेगारीचा कट रचणे किंवा गुन्ह्यासाठी मदत करणे. संघटित गुन्हेगारी टोळीचा सदस्य असणे. टोळी प्रमुख किंवा सदस्यांवर मागील १० वर्षांत किमान दोन दोषारोपपत्र दाखल असणे आवश्यक आहे, ज्याची दखल न्यायालयाने घेतली असेल. हा गुन्हेगारी गट केवळ प्रतिबंधित वस्तू विकत नसून, त्यातून मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर आर्थिक संपत्ती गोळा करत असल्याचे सिद्ध करावे लागेल. हा गुन्हा आंतरराज्जीय स्वरूपाचा आहे (आरोपी २ किंवा त्या पेक्षा अधिक आरोपी हे मध्य प्रदेशातील आहे). त्यामुळे तपास अधिकारी पो. उप. नि. कुणाल जाधव यांना मध्य प्रदेशात जाऊन कंपनीच्या संचालक मंडळाची चौकशी करावी लागेल आणि हा माल महाराष्ट्रात कुठे आणि कोणाच्या सांगण्यावरून पुरवला जात होता, त्या मुख्य सूत्रधाराचा शोध घ्यावा लागेल.

## सोन्याने मोडले सर्व विक्रम! 10 ग्रॅमचा भाव 1.55 लाखांच्या पार

प्रतिनिधी १५ जून

**जळगाव :** जागतिक घडामोडींचा परिणाम देशांतर्गत बाजारावर दिसून येत असून, महाराष्ट्रातील जळगाव सराफा बाजारातून सोन्या-चांदीच्या दराबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. सोमवार, १५ जून रोजी सोन्या आणि चांदीच्या किमतींमध्ये मोठी वाढ नोंदवण्यात आली असून, त्यामुळे ग्राहकांची चिंता वाढली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जळगाव सराफा बाजारात सोन्याच्या दरात तब्बल ३ हजार रुपयांची वाढ झाली आहे. या वाढीनंतर १० ग्रॅम सोन्याची किंमत जीएसटीसह १ लाख ५५ हजार ५३० रुपयांपर्यंत पोहोचली आहे. त्यामुळे सोनं खरेदी करण्याचा विचार करणाऱ्या ग्राहकांना मोठा आर्थिक भार सहन करावा लागू शकतो. दुसरीकडे, चांदीच्या दरातही मोठी उसळी पाहायला मिळाली आहे. चांदीचे दर तब्बल ६ हजार रुपयांनी वाढले असून, एक किलो चांदीची किंमत जीएसटीसह २ लाख ६१ हजार ६२० रुपयांवर पोहोचली आहे.

सराफा व्यावसायिकांच्या मते, जागतिक बाजारातील घडामोडी, आर्थिक अनिश्चितता आणि गुंतवणूकदारांचा वाढता कल यामुळे मौल्यवान धातूंच्या किमतींमध्ये चढ-उतार होत आहेत.

# अमरावती जिल्हाधिकाऱ्यांच्या भूमिकेवर संशय...

## बाजोरिया पिता पुत्रांनी पुराव्यासह केले आरोप.....



प्रतिनिधी १५ जून

**अकोला :** विधान परिषदेच्या अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीत आता एक मोठा ट्विस्ट येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शिवसेनेचे माजी आमदार विप्लव बाजोरिया यांचा अपक्ष म्हणून भरलेला उमेदवारी अर्ज निवडणूक अधिकाऱ्यांनी रद्द केला होता.

या रद्द केलेल्या अर्जावरून आता माजी आमदार गोपीकिशन बाजोरिया आणि विप्लव बाजोरिया या पिता-पुत्रांनी निवडणूक प्रक्रियेवरच गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, काही खळबळजनक पुरावे समोर आणले आहेत. अमरावतीची संपूर्ण निवडणूकच मॅनेज झाली असून विप्लव बाजोरिया यांचा अर्ज बाद करण्यासाठी कॉंग्रेस आणि भाजप हे दोन्ही विरोधी पक्ष एकत्र आल्याचा दावाही त्यांनी केला आहे.

विप्लव बाजोरिया यांचा उमेदवारी अर्ज ज्या त्रुटी दाखवून बाद करण्यात आला, अगदी तशाच पद्धतीने भरलेले इतर १७ मतदारसंघांतील उमेदवारांचे अर्ज वैध ठरवण्यात आले आहेत, असा दावा बाजोरिया यांनी केला आहे. त्यांनी अमरावती, वर्धा, जळगाव, ठाणे, परभणी आणि हिंगोली यांसह इतर मतदारसंघांतील तब्बल १७ ते २० उमेदवारांच्या अर्जांचे नमुने पुरावे म्हणून गोळा केले आहेत. यातील बिनविरोध निवडून आलेल्या यवतमाळ, वर्धा आणि ठाणे मतदारसंघातील अनुक्रमे दुष्यंत चतुर्वेदी, अरुण लखानी आणि रवींद्र फाटक यांचे उमेदवारी अर्ज आपल्याच उमेदवारी अर्ज प्रमाणे भरल्याचा बाजोरियांचा दावा केला आहे. तर यातील काही महत्त्वाच्या उमेदवारांनी माहितीचे अनेक रकाने रिकामे ठेवल्याचं आणून दिलं निदर्शनास आणून दिले आहे. आपल्या अर्जात माहितीचा कोणताही रकाना रिकामा नसल्याचा केलं स्पष्ट केले. यासोबतच शपथपत्र आणि त्यावरच्या स्वाक्षऱ्या आणि शिक्के अतिशय अचूक आणि बरोबर असल्याचा दावा केला आहे.

### अधिकारी झाले मॅनेज

'मीनाक्षी नटराजन यांच्यासोबत झाले आहे तेच आमच्यासोबत झाले आहे. माझा उमेदवारी अर्ज परिपूर्ण असतानाही तो का नाकारण्यात आला? असा दुजाभाव कशासाठी? अमरावतीच्या स्थानिक नेत्यांनी आपल्या विरोधात कट केला. माझ्याकडे १७ उमेदवारी अर्ज आहेत. त्यामध्ये यवतमाळ आणि ठाण्याचे उमेदवार तर निवडून आले आहेत. अमरावतीचे निवडणूक अधिकारी मॅनेज आहेत,' असा आरोप विप्लव बाजोरिया यांनी केलाय.

### ठरवून रद्द केले अर्ज

'आमचा उमेदवारी अर्ज रद्द होऊ शकत नाही. मी आणि मुलगा दोघेही वकील आहोत, आम्ही पाच निवडणुका लढलो आहोत. आम्हाला 'इलेक्शन पिटीशन' मध्ये नक्की यश आणि न्याय मिळेल. त्यांनी गोलमाल करून विप्लव यांचा अर्ज बाद ठरवला. आमच्याप्रमाणेच उमेदवारी अर्ज भरलेला यवतमाळ, जळगाव, हिंगोली-परभणी, ठाणे, वर्धा येथील उमेदवारांचे अर्ज स्वीकृत करण्यात आले आहेत,' असे त्यांनी म्हटले.

# धान्य बाजारपेठेत लाखोंची फसवणूक

## व्यापारी वर्गात खळबळ ! लाखो रुपये हडपल्याचा आरोप

प्रतिनिधी १५ जून

**अकोला:** अकोला येथील प्रतिष्ठित 'नया किराणा अनाज बाजार' (बायपास मंडी) मध्ये दोन ते तीन नामांकित दलालांनी (ब्रोकर्स) व्यापाऱ्यांची आणि बाहेरील जिल्ह्यातील व्यापाऱ्यांची संगनमताने लाखों रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. ब्रोकर संजय, लक्ष्मीकांत आणि रवी यांच्या या कारनाम्यामुळे संपूर्ण अकोला बाजारपेठेत प्रचंड खळबळ उडाली असून, व्यापाऱ्यांमधून 'अशा फसवणूक करणाऱ्या दलालांचे लायसन्स रद्द का करत नाही ?' असा जळजळीत सवाल उपस्थित केला जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मान्यताप्राप्त ब्रोकर संजय याने बाहेरगावच्या विविध व्यापारी संस्थांकडून माल खरेदी-विक्रीच्या व्यवहारापोटी लाखो रुपये वसूल केले. मात्र, हे हक्काचे पैसे त्याने अकोल्यातील मूळ व्यापाऱ्यांना सुपूर्द न करता स्वतःकडेच दाबून ठेवल्याचा खळबळजनक आरोप आहे.

### रवी आणि लक्ष्मीकांत यांचा बोगस पार्ट्यांचा खेळ!

दुसऱ्या एका प्रकरणात, दलाल लक्ष्मीकांत, रवी आणि चेतन यांनी अकोला धान्य बाजारातील १० ते १५ ठोक व्यापाऱ्यांना टार्गेट केले. त्यांनी उमरखेड, फुलसावंगी, काली दौलत, बाहेगाव परिसरातील काही बोगस (बनावट) पार्ट्या तयार केल्या. रवी याने ज्या पार्ट्यांना डाळ आणि इतर किराणा माल पाठवल्याचे दाखवले, प्रत्यक्षात त्या पार्ट्यांना कोणताही माल मिळालाच नसल्याचे समोर आले आहे. व्यापाऱ्यांनी दिलेल्या तक्रार अर्जानुसार माल घेऊनही अद्याप पैसे देण्यात आलेले नाहीत. व्यापाऱ्यांनी पैशांची मागणी केली असता त्यांना उडवाउडवीची उत्तरे दिली जात आहेत. या दलालांनी बनावट पार्ट्या तयार करून बाजारपेठेची फसवणूक केल्याचे तक्रारीत नमूद आहे. या गंभीर प्रकरणाची दखल घेत 'अकोला होलसेल मर्चंट' चे सचिव कासमअली नानाजीभाई यांनी एक जाहीर नोटीस प्रसिद्ध केली आहे. या नोटिसीद्वारे सर्व सभासद आणि व्यापारी बांधवांना सूचित करण्यात आले आहे की, दलाल संजय, लक्ष्मीकांत आणि विनोद यांच्याशी संबंधित कोणत्याही व्यापाऱ्यांचे काही पैशांचे व्यवहार किंवा बिल बाकी असतील, तर त्याचे संपूर्ण विवरण बिलासह संस्थेच्या ऑफिस लेखी तक्रार करावी. या मुदतीनंतर येणाऱ्या कोणत्याही अर्जावर किंवा दाव्यावर संस्था विचार करणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

### ब्रोकरचे लायसन्स कॅन्सल का होत नाही ?

अकोला बाजारपेठ ही संपूर्ण विदर्भात विश्वासासाठी ओळखली जाते. मात्र, अशा काही ठराविक ब्रोकर अर्थात दलालांच्या लाखो रुपयांच्या बोगस आणि बनावट व्यवहारांमुळे बाजाराची पत धोक्यात आली आहे. हक्काचे पैसे अडकल्यामुळे संतप्त झालेल्या व्यापाऱ्यांनी आता आक्रमक भूमिका घेतली असून, 'अशा फसवणूक करणाऱ्या दलालांचे परवाने (लायसन्स) तातडीने रद्द का केले जात नाहीत?' असा संतप्त सवाल बाजार समिती आणि असोसिएशनच्या प्रशासनाला विचारला आहे.

## टीईटी २८ जूनला!

**मुंबई:** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांनी महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०२६ पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. परीक्षार्थ्यांचे हित लक्षात घेऊन महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०२६ आता रविवार, २८ जून २०२६ रोजी घेण्यात येणार असल्याचे परिषदेने जाहीर केले आहे.









# तांदळी येथे 50 ते 60 मेंढ्यांचा झाला गूढ मृत्यू

## मेंढपाळ संकटात, शासनाकडून मदतीची अपेक्षा

प्रतिनिधी १५ जून

**अकोला :** तांदळी गावात एक अत्यंत धक्कादायक आणि चिंताजनक घटना समोर आली आहे. एका मेंढपाळाच्या तब्बल ५० ते ६० मेंढ्यांचा अचानक गूढ मृत्यू झाल्याने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. या मोठ्या नुकसानामुळे मेंढपाळ कुटुंबावर आभाळ कोसळले असून, शासनाने तातडीने मदत करावी, अशी मागणी केली जात आहे. मेंढपाळ साहेबराव हरीभाऊ शिंगाडे हे आपल्या मेंढ्यांचा कळप घेऊन शिरल्याहून तांदळीकडे येत होते. तांदळी येथे आल्यानंतर त्यांनी शिवलाल पाटील यांच्या शेतात मुक्काम ठोकला. मात्र, प्रवासादरम्यान आणि शेतात मुक्कामी असतानाच अचानक मेंढ्यांची प्रकृती बिघडली आणि त्या एकापाठोपाठ एक दगावू लागल्या. एवढ्या मोठ्या



प्रमाणात जनावरांचा मृत्यू होऊनही प्रशासनाने किंवा संबंधित पशुसंवर्धन विभागाने अद्याप या घटनेची पुरेशी दखल घेतलेली नाही, असा आरोप पीडित मेंढपाळाने केला आहे. मेंढ्यांचा मृत्यू नेमका कशामुळे झाला—काही आजारामुळे की विषबाधेमुळे—हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. पशुसंवर्धन विभागाने तातडीने घटनास्थळी भेट देऊन मृत मेंढ्यांचे शवविच्छेदन करावे.मृत्यूचे नेमके कारण शोधून काढून उर्वरित जनावरांना वाचवण्यासाठी उपाययोजना कराव्यात. आर्थिकदृष्ट्या खचलेल्या शिंगाडे कुटुंबाला शासनाने तात्काळ आर्थिक भरपाई द्यावी. या घटनेमुळे स्थानिक पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, आता तरी प्रशासन जागे होऊन मदत करणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## जठारपेठेतील नालीचा मलबा रस्त्यावरच
### घाण धुळीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात



प्रतिनिधी १५ जून

**अकोला :** जठारपेठ परिसरातील नाल्यांची साफसफाई केल्यानंतर काढण्यात आलेला मलबा (गाळ) गेल्या काही दिवसांपासून रस्त्यावरच पडून आहे. हा वाळलेला मलबा आता धुळीच्या रूपाने थेट नागरिकांच्या घशात जात असल्याने तीव्र संताप व्यक्त होत आहे. महापालिकेने नालीची साफसफाई आणि मलबा उचलण्याचे काम एकाच दिवसात करावे, अशी आग्रही मागणी आता जोर धरू लागली आहे.

नाल्यांमधून काढलेला ओला कचरा रस्त्याच्या कडेला आणून टाकला जातो. मात्र, तो वेळेवर उचलला न गेल्याने उन्हामुळे आणि वाहनांच्या वर्दळीमुळे त्याचे बारीक धुळीत रूपांतर होते. ही दुर्गंधीयुक्त धूळ हवेत उडत असल्याने परिसरातून जाणाऱ्या नागरिकांना, विशेषतः ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना श्वासोच्छवासाचा त्रास होत आहे. 'नालीची घाण धुळीच्या माध्यमातून आमच्या घशात जात आहे,' अशी संतप्त प्रतिक्रिया येथील नागरिकांनी दिली आहे.जठारपेठ हा भाग व्यापारी दृष्ट्या आणि खाद्यपदार्थांच्या दुकानांसाठी ओळखला जातो. या मुख्य रस्त्यावर अनेक हॉटेल्स, चहाच्या टपऱ्या आणि स्ट्रीट फूडचे स्टॉल्स आहेत. रस्त्यावरील उडणारी ही दूषित धूळ थेट खाद्यपदार्थांवर बसत असल्याने नागरिकांच्या आरोग्याला दुहेरी धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे या परिसरातील खाद्य दुकानदारांनी आपले पदार्थ व्यवस्थित झाकून ठेवावेत आणि स्वच्छतेबाबत कमालीची दक्षता घ्यावी, असे आवाहनही सुज्ञ नागरिकांकडून केले जात आहे. या गंभीर समस्येकडे महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागाने तातडीने लक्ष देऊन रस्त्यावरील मलबा त्वरित हटवावा, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे. अन्यथा आंदोलनाचा पवित्रा घेण्याचा इशाराही काही स्थानिकांनी दिला आहे.

## पहिल्या पावसाचे पाणी साचले

**अकोला :** उन्हाळ्यानंतर जेव्हा पहिला पाऊस पडतो, तेव्हा तो आपल्यासोबत मातीचा सुगंध आणि सुखद गारवा घेऊन येतो. परंतु, या पहिल्याच पावसामुळे अनेकदा शहरांची आणि गावांची दुरवस्था समोर येते. यंदाही पहिल्याच पावसाने जोरदार हजेरी लावली आणि अवघ्या काही तासांतच रस्त्यांवर, सखल भागांत आणि गल्लीबोळांत पाणी साचले.

पावसाचा जोर वाढताच शहरातील प्रमुख रस्ते जणू पाण्याच्या प्रवाहात वाहून गेले. पाण्याचा निचरा होणारी गटारे आणि नाले कचऱ्यामुळे तुंबल्यामुळे पाण्याचा प्रवाह रस्त्यांवर आला. यामुळे वाहनचालकांना गाडी चालवणे कठीण झाले आणि अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी निर्माण झाली. काही दुचाकी वाहने पाण्यात बंद पडल्याने नागरिकांची मोठी धावपळ उडाली. चाकरमाने, शाळकरी मुले आणि व्यापारी यांचे यामुळे प्रचंड हाल झाले. सखल भागातील काही घरांमध्ये आणि दुकानांमध्ये पाणी शिरल्याने मोठे नुकसान झाले.

## अडगांव बु. येथे खा. अनुप धोत्रे यांची सांत्वनपर भेट




प्रतिनिधी १५ जून

**अडगांव बु. :** खासदार अनुप धोत्रे यांनी अडगांव बु येथे भेट देऊन भारतीय जनता पक्षाच्या स्थानिक कार्यकर्त्यांच्या शोकग्रस्त कुटुंबीयांचे सांत्वन केले. त्यामधे अडगांव ग्रामपंचायतीचे गटनेते भाजपा जिल्हा किसान आघाडीचे उपाध्यक्ष संजय राजनकार यांचे वडील स्व.रामदास राजनकार यांचे नुकतेच निधन झाले.

खासदार अनुप धोत्रे यांनी यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांचे सांत्वन केले व भाजप बूथ प्रमुख मंगेश लापूरकार यांचे बंधू स्व.संतोष लापूरकर यांच्या निधनाबद्दल, तसेच रमेश मानपुत्र यांचे वडील स्व.श्रीराम मानपुत्र यांच्या निधनाबद्दल ही खासदार धोत्रे यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन कुटुंबीयांची भेट घेतली व त्यांचे सांत्वन केले. दुःखद प्रसंगी पक्षाचे खासदार थेट घरी आल्यामुळे कार्यकर्त्यांना मोठा मानसिक धीर मिळाला.

या सांत्वनपर भेटीदरम्यान खासदार अनुप धोत्रे यांच्यासोबत भाजपचे स्थानिक पदाधिकारी डॉ. मनमोहन व्यास, पुजाजी मानकर, पंकज देशमुख, नाना देशमुख दीपक कौठकार अभिजीत ढगे, निलेश वानखडे, प्रल्हाद भोपळे,प्रफुल्ल मानकर, यांच्यासह गावातील इतर नागरिक व भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

## दिन विशेष
### आज जागतिक पवन दिन



पवन ऊर्जा आणि त्याच्या वापराविषयी जनजागृती करण्यासाठी दरवर्षी १५ जून रोजी जागतिक पवन दिन साजरा केला जातो. पवन दिन पाळण्याची सुरुवात २००७ पासून झाली. २००९ साली त्याचे नामकरण जागतिक पवन दिन असे झाले. विंडयुरोप आणि जागतिक पवन ऊर्जा परिषदेद्वारा हा दिवस पाळला जातो.

जागतिक पवन दिन पवन ऊर्जेबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी साजरा केला जातो. या दिवशी जगभरातील विविध कार्यक्रमांद्वारे नैसर्गिक ऊर्जेच्या या स्वरूपाचे महत्त्व समजावून सांगितले जाते. जागतिक पवन दिन दरवर्षी १५ जून रोजी साजरा केला जातो. याला जागतिक पवन ऊर्जा दिन असेही म्हणतात. युरोपियन विंड एनर्जी असोसिएशनने २००७ मध्ये प्रथमच हा सण साजरा केला, नंतर तो जागतिक पवन ऊर्जा परिषदेच्या सहकार्याने विविध कार्यक्रमांद्वारे जागतिक स्तरावर साजरा करण्यात आला. या दिवशी जगभरातील लोकांना पवन ऊर्जेचे महत्त्व पटवून देण्याचा निर्णय दोन्ही संस्थांकडून घेण्यात आला. युरोपियन विंड एनर्जी असोसिएशनने २००७ मध्ये पहिल्यांदा हा दिवस साजरा केला. नंतर, ग्लोबल विंड एनर्जी कौन्सिलच्या मदतीने हा दिवस विविध कार्यक्रमांच्या आधारे जागतिक स्तरावर साजरा करण्यात आला. त्यानंतर, २००९ मध्ये, जागतिक स्तरावर साजरा करण्याची घोषणा करण्यात आली. या दिवशी लोकांना स्वच्छ हवेचे महत्त्व सांगितले जाईल, असे दोन्ही संस्थांनी ठरवले. या दिवशी वातावरणातील कार्बनचे प्रमाण कमी करण्यासाठी लोकांना जागरूक केले जाते. पवन दिनाशी संबंधित कार्यक्रम ७५ हून अधिक देशांमध्ये आयोजित केले जात आहेत. या दिवशी जगभरात पवन ऊर्जेचा दैनंदिन जीवनात वापर करणे, वातावरणातील कार्बनचे प्रमाण कमी करणे आणि पवन ऊर्जा उत्पादन क्षेत्रात रोजगाराला चालना देणे यासंबंधी कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या दिवशी लोकांना पवन ऊर्जेचा वापर आणि त्यातून मिळणारे फायदे देखील कळतात. वैश्विक पवन दिवस, ज्याला विश्व पवन दिवस म्हणून देखील ओळखले जाते. हा पवन ऊर्जेची क्षमता, आपली ऊर्जा प्रणालिनां बदलणे, आपली अर्थव्यवस्थांमध्ये कार्बन उत्सर्जनला कमी करणे आणि रोजगार सृजन आणि आर्थिक विकासाला प्रोत्साहित करण्याची याच्या क्षमतेचा पत्ता लावणे या संधीच्या रूपात कार्य करते. हा दिवस आपल्याला हवेची शक्ती आणि आपली ऊर्जा परिदृश्यला नवीन रूप देण्यासाठी प्रदान केली जाणारी अपार संभावना मध्ये उतरण्यासाठी प्रोत्साहित करतो. आज, पवन ऊर्जा एक चांगल्या प्रकारे स्थापित आणि प्रमुख टेक्नॉलॉजी मध्ये विकसित झाली आहे. जी जगभरात सर्वात जलद गतीने वाढत्या क्षेत्रांमधील एकाच्या रूपात वाढत आहे. एकटया युरोपीय संघामध्ये, पवन उद्योग ने मागील वर्षी गॅस आणि कोळसाच्या संयुक्त प्रतिष्ठानां पार केले. या क्षेत्रामध्ये पवन ऊर्जाची संचयी स्थापित क्षमता आता याची विजेच्या खपत १५ टक्के आहे, जी ८७ मिलियन घरांना वीज देण्याच्या बरोबरीची आहे.

पवन ऊर्जा ऊर्जेचे एक नवीकरणीय स्रोत आहे. जे वीज उत्पन्न करण्यासाठी हवेच्या शक्तीचा उपयोग करते. जीवाश्म ईंधनच्या विरुद्ध, पवन ऊर्जा नैसर्गिक संसाधांनाकमी करत नाही आणि यावर न्यूनतम पर्यावरणीय प्रभाव पडतो. पवन ऊर्जा ग्रीनहाउस गॅस उत्सर्जनला कमी करून जलवायु परिवर्तनला कमी करण्यामध्ये महत्वपूर्ण भूमिका निभावते. पवन ऊर्जा मधून उत्पन्न बिजली जीवाश्म इंधन आधारित बिजली उत्पादनला बदलण्यामध्ये मदद करते, जी वैश्विक कार्बन डाइऑक्साइड उत्सर्जन आणि जलवायु परिवर्तन मध्ये महत्वपूर्ण योगदान देते. पवन ऊर्जा विजेचा एक स्वच्छ आणि विश्वसनीय स्रोत प्रदान करून सतत विकासाला चालना देते आहे. ही ऊर्जा मिश्रणमध्ये विविधता आणणे, जीवाश्म इंधन वर निर्भरतेला कमी करणे आणि ऊर्जा सुरक्षेला मदत करते.

## कस्तुरी ची 'वारी शिक्षणाची' २ जुलै रोजी

प्रतिनिधी १५ जून

**अकोला :** आषाढ महिन्यात वारकरी विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरची वारी करतात. आषाढी एकादशीला विठू माऊलीचं दर्शन घेऊन वारकरी सुखावत असतांना ' कस्तुरी' ही सामाजिक संस्था मात्र मेळघाट परिक्षेत्रातील अतिदुर्गम भागातील जि.प. प्राथमिक शाळांत शिकणाऱ्या गरीब व आदिवासी विद्यार्थ्यांसाठी 'वारी शिक्षणाची' या उपक्रमाच आयोजन करून या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्याचा प्रयत्न करीत असते. विठू माऊलीचं दर्शन या गरजू आदिवासी मुलांमध्ये घेऊन स्वतःला धन्य मानत असते.

शासनाकडून या मुलांना पाठ्यपुस्तके, गणवेश इ. सुविधा मिळतात परंतु स्कूल बॅग्स , वॉटरबॉटल , छत्री ,पेन , पेन्सिल , स्केल, रबर इ.साहित्य कोठून आणायचं या विवंचनेत पालक असतांनाच ' कस्तुरी' या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी 'वारी शिक्षणाची' हा उपक्रम मागील ५ वर्षांपासून राबवित असून आतापर्यंत १५०० गरीब विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा या उपक्रमाच्या माध्यमातून पूर्ण केल्या आहेत.. कस्तुरीने येत्या २ जुलै रोजी ' वारी शिक्षणाची' या उपक्रमाचे आयोजन केले असून अकोट अंजनगाव मार्गावरील अकोली जहांगीर पासून आडवळणावर व शहरी वातावरणा पासून कोसोदुर असलेली १०० टक्के आदिवासी गावे जनुना व वस्तापूर येथील जि प च्या शाळांमध्ये शिकणाऱ्या २६० आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करणार आहे.

या अभिनव उपक्रमासाठी शहरातील सेवाभावी संस्था स्व. अथर्व अनिल मुळे मल्टीपर्पज फाउंडेशन, कृष्णार्पण प्रतिष्ठान, डॉ. कुसुमाकर घोरपडे, जगन्नाथ पटेल, सुभाष श्रावगी, ओमप्रकाश खंडेलवाल, कमलकिशोर हरितवाल, अनिता इधोळ, सौ.संगीता धनंजय घोंगडे, यशवंत देशपांडे व अनेक मान्यवर देणगीदारांची साथ मिळत असून प्रकल्प यशस्वी होण्यासाठी संजय गायकवाड (प्रकल्प प्रमुख) , माजी आमदार वसंतराव खोटरे, संजय ठाकरे , अनिल पालवे , घनश्याम चांडक, राजेश्वर पेठकर , चेतना आनंदानी , सौ. अपर्णा काळे , दीपक झाडे , वसंतराव देशमुख , संजय बुटोले व सर्व कस्तुरी प्रेमी श्रम घेत आहेत. समाजबांधवांनी सेवाभावी उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन केले आहे.

## जागतिक नेत्रदान दिनानिमित्त नेत्र तपासणी शिबिर

प्रतिनिधी १५ जून

**अकोला :** यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक संलग्न शिवाजी महाविद्यालय, अकोला अभ्यास केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि गाडगे बाबा सामाजिक प्रतिष्ठान, यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक नेत्रदान दिनानिमित्त नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

यावेळी नेत्र तपासणी करून नेत्रदानाचे महत्त्व, त्याची



सामाजिक गरज आणि नेत्रदानाबाबत असलेल्या विविध गैरसमजांविषयी जनजागृती करण्यात आली.

या शिबिरासाठी नेत्र हॉस्पिटलचे सुधाकर वानखडे यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे अध्यक्ष व केंद्रप्रमुख डॉ. रामेश्वर भिसे यांनी यावेळी मरणोत्तर नेत्रदान संकल्प फॉर्म भरून नेत्रदानाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविला. यावेळी त्यांनी अध्यक्षीय मनोगतात नेत्रदानाचे महत्त्व विशद करताना नेत्रदान श्रेष्ठ दान असून आपल्या मृत्यूनंतरही आपल्या डोळ्यांमुळे दोन अंध व्यक्तींच्या जीवनात प्रकाश निर्माण होऊ शकतो. त्यामुळे प्रत्येकाने नेत्रदानाचा संकल्प करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमाचे नियोजन व समन्वय केंद्र संयोजक डॉ. संजय तिडके यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रासेयो स्वयंसेवक सायली गोतमारे, रोशन चव्हाण, अभिषेक चव्हाण, प्राध्यापक, कर्मचारी तसेच गाडगे बाबा सामाजिक प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. नेत्रदान कार्याची व्याप्ती वाढावी या अनुषंगाने श्री शिवाजी महाविद्यालयात शिबिराचे आयोजन केले होते. चांगला प्रतिसाद मिळाला.

## २३ वर्षांच्या देशसेवेचा गौरव; संदीप अस्वार यांच्या सेवानिवृत्ती सोहळ्याचे आयोजन

**अकोट :** भारतीय सैन्य दलात २३ वर्षे देशसेवा बजावून सेवानिवृत्त झालेल्या आंबोडा येथील सुपुत्र संदीप हरिदास अस्वार यांच्या सन्मानार्थ भव्य सेवानिवृत्ती व सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी ग्रामस्थ, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून संदीप अस्वार यांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार व स्मृतिचिन्ह देऊन गौरव केला. उपस्थितांनी त्यांच्या २३ वर्षांच्या गौरवशाली सेवेला सलाम करत देशरक्षणासाठी दिलेल्या




योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.संदीप अस्वार यांनी सैन्य सेवेदरम्यान विविध ठिकाणी कर्तव्य बजावत देशाच्या सुरक्षेसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या प्रामाणिकपणा, शिस्तबद्धता आणि कर्तव्यनिष्ठेमुळे सोबतच त्याची पत्नी अकोट शहर पोलीस स्टेशन येथे कार्यरत आहेत.

त्यांनी पण महिलांकरिता उत्कृष्ठ कामगिरी बजावलेली त्यांनी आपल्या गावाचे तसेच जिल्ह्याचे नाव उंचावले असल्याचे मान्यवरांनी आपल्या मनोगतात सांगितले.

कार्यक्रमादरम्यान त्यांच्या सेवाकाळातील आठवणींना उजाळा देण्यात आला. गावकऱ्यांनी त्यांच्यावर पुष्पवृष्टी करून आणि घोषणाबाजी करत उत्स्फूर्त स्वागत केले. सेवानिवृत्तीनंतरही समाजसेवा व युवकांना मार्गदर्शन करण्याचे कार्य त्यांनी सुरू ठेवावे, अशी अपेक्षा उपस्थितांनी व्यक्त केली.या भावपूर्ण सोहळ्यात कुटुंबीय, ग्रामस्थ, माजी सैनिक, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार मंडळी व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे वातावरण देशभक्तीपर घोषणांनी आणि टाळ्यांच्या कडकडाटाने भारावून गेले.

## मुख्याध्यापकाने दिला मुलीच्या लग्न पत्रिकेतून पर्यावरण निर्मितीचा संदेश

प्रतिनिधी १५ जून

**हिवरखेड :** येथील स्थानिक जि, प, प्राथमिक कन्या शाळेचे मुख्याध्यापक निलेश खिरोडकार यांच्या कन्याचा मोठा लग्न सोहळा येत्या १७ तारखेला पार पडणार आहे त्यापूर्वी त्यांनी आपल्या मुलीच्या लग्न पत्रिकेचे सर्व वितरण केले,या पत्रिकेतून पाहुणे मंडळींचा नव्हे तर सर्व नागरिकांना पर्यावरण निर्मितीसह, शिक्षणाचे मौल्य जपण्याचा संदेश दिला यामध्ये झाडे लावा झाडे जगवा, वरून




राजा निसर्ग राजा बळीराजा प्रसन्न व्हा, शाळा शिका शिकवा, जल है तो कल है, स्वच्छ भारत अभियान यासह विविध सामाजिक संदेश या पत्रिकेतून घरोघरी पोहचवण्याचे कार्य जि प शाळेचे मुख्याध्यापक यांनी या कल्पनेतून केले.

## मिनी तिसरी तायक्वांडो स्पर्धा, बक्षीस वितरण सोहळा थाटात

प्रतिनिधी १५ जून

**मूर्तिजापूर :** स्थानिक सिटी तायक्वांडो क्लब आणि जे. बी. हिंदी हायस्कूलच्या प्रांगणात आयोजित करण्यात आलेली 'मिनी तिसरी तायक्वांडो स्पर्धा' अत्यंत उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. स्वर्गीय पार्थ प्रशांत हजारी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ या विशेष स्पर्धेचे आयोजन १२ आणि १३ जून रोजी करण्यात आले होते. दोन दिवस चाललेल्या या थरारक स्पर्धेनंतर रविवारी अंतिम सामन्यांसह बक्षीस वितरण सोहळा अत्यंत थाटामाटात संपन्न झाला.यावेळी प्रथम क्रमांक सम्यक खंडारे, सर्वश्रेष्ठ फायटर,तर द्वितीय क्रमांक रोहित




खंडारे, सर्वश्रेष्ठ फायटर ज्युनिअर,तर तृतीय क्रमांक विधी यादव, सर्वश्रेष्ठ फायटर (बालिका वर्ग) यांना प्रदान करण्यात आला.या विजेत्यांचा उपस्थित अतिथींच्यां हस्ते पुष्पगुच्छ व प्रमाणपत्रे व पदके देऊन सन्मानित करण्यात आले.

स्पर्धेच्या सांगता समारंभाला आणि बक्षीस वितरण कार्यक्रमाला शहरांतील विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लावली होती. यामध्ये अकोला जिल्हा दुध उत्पादक संघाचे जिल्हाध्यक्ष प्रशांत हजारी, नगराध्यक्ष हर्षल साबळे, रितेश सबाजकर, प्राचार्य सत्यनारायण तिवारी, शिक्षक झाकीर,प्रा विनोद काळपांडे,विलास नसले, गजानन वर्घट, रवी चव्हाण, रवी गोंडकर, सुनील भोजगडिया, सरवरे, मोहन ३िवघे, विलास वानखडे, शेख इम्रान, जीतू चौबे, मनिष अगुलवार, दिवाकर सोनोने व येवले या मान्यवरांचा समावेश होता. खेळाडूंना प्रोत्साहन देणे हीच खरी श्रद्धांजली' व्यासपीठावरील मान्यवरांनी स्वर्गीय पार्थ प्रशांत हजारी यांच्या स्मृतींना उजाळा देत, अशा स्पर्धांमुळे स्थानिक स्तरावरील खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ मिळते आणि त्यांच्यातील खेळाडूला आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकण्याची संधी मिळते, असे मत व्यक्त केले.

**विजेत्यांवर कौतुकाचा वर्षाव.**
स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाच्या विजेत्या खेळाडूंना मान्यवरांच्या हस्ते सुवर्ण, रौप्य व कांस्य पदक आणि फिरता चषक देऊन गौरविण्यात आले. आयोजनासाठी परिश्रम घेणारे प्रशिक्षक दिनेश न्क्रीडा शिक्षक ज्ञानेश टाले, हरीश अग्रवाल,लखन ढेंगेकर,हर्ष दोशी,नक्ष देशपांडे, हितेश जोशी,प्रतिक यदवर, अभिषेक तिवारी, सम्यक खंडारे,सानवी नांदेकर ओमकार अग्रवाल,राज घाटोळे,शुभम यादव या सर्व प्रशिक्षक, पंच आणि स्वयंसेवकांचे आभार मानण्यात आले.

## निधन वार्ता



**त्र्यंबकराव देशमुख**

**खामगांव :** खामगाव तालुक्यातील सुटाळा येथील वसंतराव त्र्यंबकराव देशमुख यांचे वडील त्र्यंबकराव भिकनराव देशमुख यांच्या दि.१२ जून रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी वृद्धपकाळाने दुःखद निधन झाले त्यांच्यामागे तीन मुले सुना नातवंड असा बराच मोठा परिवार मागे आहे.

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर ८३९०६७०९९९ या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.

त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

## राज्यस्तरीय सह्याद्रीरत्न पुरस्काराने महंत गणेशानंदगिरी महाराजांचा गौरव

**पातूर :** पुणे येथे १४ जून रोजी आनंदा फाउंडेशनतर्फे आयोजित राज्यस्तरीय सह्याद्रीरत्न पुरस्कार सोहळा उत्साहात पार पडला. या सोहळ्यात अकोला विभागातून नवनाथांची सात्विक पद्धतीने सेवा करणारे, गोरक्षण कार्यात सक्रिय योगदान देणारे तसेच युवा पिढीमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करणारे श्री श्री १०८ श्री महंत गणेशानंदगिरी महाराज यांना राज्यस्तरीय सह्याद्रीरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा मानाचा पुरस्कार सुप्रसिद्ध अभिनेते सुनील नाना गोडबोले, ॲड. गांधी तसेच उद्योजिका पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.




# हिवरखेडच्या विकास कामांसाठी निधी कमी पडू देणार नाही : आमदार प्रकाश भारसाकळे

प्रतिनिधी १५ जून

**हिवरखेड :** नगरपरिषद अंतर्गत अकोट मतदार संघाचे लोकप्रिय आमदार प्रकाश भारसाकळे यांच्या विकास निधीतून व प्रयत्नांतून हिवरखेड येथे २ कोटी ६३ लक्ष रुपयाच्या विकास कामांचे भूमिपूजन १४ जून रोजी संपन्न झाले. या सोहळ्याचे उद्घाटक म्हणून अकोट विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश भारसाकळे हे होते तर अध्यक्षस्थानी भाजपाचे अकोला जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर हे होते.

प्रमुख उपस्थितीत हिवरखेडच्या नगराध्यक्ष सुलभा रमेश दुतोंडे, रमेश दुतोंडे, उपाध्यक्ष प्रतिभा वीरेंद्र येऊल, हिवरखेड नगर परिषदेच्या गटनेत्या वैशाली गणेश वानखडे, सभापती वंदना राजेश वानखडे, प्रमिला रविंद्र मानकर, वैभव गावंडे, अजिज खा जमीर खा, उपसभापती अनिता रवींद्र वाकोडे, नगरसेविका दिपाली संदिप इंगळे, नादिया अंजुम नसीम खान, रुबीना आज अब्दुल सलमान, दिपक रायबोले, दानिश खा रसूल खा, प्रथमेश नाठे, किरण सेदानी हिवरखेड मंडळाध्यक्ष वैभव पोटे, यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे प्रमुख नेते उपस्थित होते. सदर विकास कामे शहरातील विविध प्रभागात होत असून यामध्ये सदाशिव संस्थान येथे १ कोटी रुपयांचे नमो उद्यान, प्रभाग क्रमांक ६ मध्ये वैष्णव किराणा ते गजानन भगत यांच्या घरापर्यंत २३ लक्ष रुपयांचा पेवर ब्लॉक रस्ता, प्रभाग क्रमांक ८,१० मध्ये मुन्नाभाई मीरसाहेब ते मुदस्सीर अली यांच्या घरापर्यंत २३ लक्ष रुपयाचा पेवर ब्लॉक रस्ता, प्रभाग क्रमांक ९ मध्ये जुनी ग्रामपंचायत ते अनिकेत लोणकर यांच्या घरापर्यंत १२ लक्ष रुपयाचा पेवर ब्लॉक रस्ता, प्रभाग क्रमांक ४ मध्ये दीपक राजनकर हे अतुल नाठे यांच्या घरापर्यंत १२ लक्ष रुपयाचा पेवर ब्लॉक रस्ता, १६ लक्ष रुपयाची नगरपरिषद कार्यालयाचे दुरुस्ती तथा साहित्य खरेदी, सदाशिव संस्थान येथे १७ लक्ष रुपयांच्या जलकुंभाचे बांधकाम, प्रभाग क्रमांक ८ मध्ये दिपक राऊत ते किरण हागे यांच्या घरापर्यंत १२ लक्ष रुपयाचा पेवर ब्लॉक रस्ता, प्रभाग क्रमांक ३ मध्ये गणेश ओंकारे ते रुपेश काळे यांच्या घरापर्यंत १० लक्ष रुपयाचा पेव्हर ब्लॉक रस्ता, प्रभाग क्रमांक ७ मध्ये अब्दुल खान ते आसिफ खान यांच्या घरापर्यंत ६ लक्ष रुपयाचा पेव्हर ब्लॉक रस्ता, हिवरखेड नगरपरिषद फिल्टर प्लांट येथे २७ लक्ष रुपयाची दुरुस्ती, रंगरंगोटी, वाळू बदल, व हाय मास्टर लाईट बसविणे अश्या एकूण २ कोटी ६३ लक्ष रुपयांच्या विकास कामांचे भूमिपूजन करण्यात आले. कार्यक्रमा दरम्यान घरकुल लाभार्थ्यांना घरकुल मंजुरी परवानग्या वाटप करण्यात आल्या. यावेळी शिवसेनेचे सेवा सहकारी सोसायटीचे माजी संचालक महादेव गावंडे तथा युवा कार्यकर्ते ऋषिकेश गावंडे यांचा आमदार प्रकाश भाऊ भारसाकळे व भाजपा जिल्ह्याचे अध्यक्ष संतोष शिवरकर यांच्या हस्ते पक्ष प्रवेश करून घेण्यात आला. या सोहळ्याला भारतीय जनता पार्टीच्या समस्त पदाधिकारी, बूथ प्रमुख, शक्ती केंद्रप्रमुख, नेते मंडळी तथा कार्यकर्ते यांच्यासह गावकऱ्यांची उपस्थिती होती. या भूमिपूजन सोहळ्याचे प्रास्ताविक रमेश दुतोंडे संचालन महेंद्र कराळे सर तर आभार केशव कोरडे यांनी मानले.



### ♦ अडीच कोटी रुपयांच्या विकास कामांचे भूमिपूजन

## ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी दिशा मिळणार : डॉ. जयराज कोरपे

### सिसा बोंदरखेड येथे भव्य सत्कार



प्रतिनिधी १५ जून

**अकोला :** ग्रामीण भागातील सेवा सहकारी संस्थांनी अनेक संकटांवर मात करत शेतकरी आणि गावकऱ्यांच्या विकासाचा पाया भक्कम केला आहे. मात्र, बदलत्या काळात सहकार क्षेत्राला नवसंजीवनी देण्यासाठी आता युवकांची मोठी फळी तयार करण्याची गरज असून आधुनिक तंत्रज्ञानाच्या बळावर सहकार चळवळीला नव्या उंचीवर नेण्याची वेळ आली आहे, असे प्रतिपादन अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. जयराज कोरपे यांनी केले.सिसा बोंदरखेड येथे आयोजित भव्य सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. याप्रसंगी सेवा सहकारी सोसायटी सिसा बोंदरखेड, डोंगरगांव, सांगळूद तसेच ग्रामपंचायत सिसा बोंदरखेड यांच्या वतीने बँकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. जयराज कोरपे यांचा भव्य सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिरीष धोत्रे, बाजार समितीचे संचालक मुकेशभाऊ मुरूमकार, नंदकिशोर गोरले (सरपंच), बंडूभाऊ हागवणे आणि डॉ. शिरीष देशमुख यांनी समयोचित मार्गदर्शन केले.व्यासपीठावर कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती ज्ञानेश्वरराव महल्ले, माजी उपसभापती निळकंठराव खेळकर, प्रभाकरराव राऊत, पर्वतराव हागवणे, प्रभाकर बढे, प्रकाशराव काळे, जगन्नाथजी गावंडे, प्रविण हागवणे, प्रकाशराव हागवणे, राजेश गावंडे, सुरेश गावंडे आणि सुनिल बढे प्रामुख्याने उपस्थित होते. सहकार क्षेत्र सक्षम झाले तरच ग्रामीण अर्थव्यवस्था अधिकाधिक विकसित होईल आणि युवा सहभागाने सहकाराचा भविष्यकाळ उज्ज्वल राहील, असा आशावाद व्यक्त करत डॉ. जयराज कोरपे यांनी युवकांना सहकाराच्या मुख्य प्रवाहात सहभागी होण्याचे आवाहन केले. याप्रसंगी बँकेचे सहाय्यक व्यवस्थापक भगवान पारधी यांनी 'ग्रामीण सूर्यघर योजने'विषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बँकेचे उपमुख्यअधिकारी रविंद्र थोरात यांनी केले, तर सूत्रसंचालन दिलीप भुईभार यांनी आणि आभार प्रदर्शन राहुल हागवणे यांनी केले.

# देशमुख महिला मंडळाची मासिक सभा उत्साहात संपन्न

## नारायण पेठ ग्रुपचा अधिक मास, पर्यावरण दिन विशेष

प्रतिनिधी १५ जून

**अकोला :** देशमुख महिला मंडळाची मे महिन्याची मासिक सभा ५ जूनला स्थानिक हॉटेल सेंटर प्लाझा येथे नारायण पेठ ग्रुपच्या आयोजनात उत्साहात संपन्न झाली .यावेळी ड्रेस कोड सह अधिक मास विशेष विविध स्पर्धा घेण्यात आल्या.

यावेळी व्यासपीठावर मंडळाच्या अध्यक्षा राजश्री ताई, सचिव स्वप्नाली ताई, ज्येष्ठ सल्लागार कविता ताई, कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या मालिनी ताई, ग्रुप लीडर प्रिती ताई उपस्थित होत्या .

कार्यक्रमाची सुरुवात विष्णू स्तोत्र व पर्यावरण विशेष माहिती देऊन करण्यात आली.तसेच मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन अधिक मास निमित्त श्रीकृष्ण पूजन झाले. पाहुण्यांना तुळशी रोपटे मातीच्या वृंदावन सहित देवून स्वागत श्रृती, रोहिणी,निलीमा यांनी केले. सर्वांचे स्वागत मनीषा, उमा, संजीवनी यांनी अधिक मासाचे वाण आणि ओटी भरून केले. स्वागत गीत साधनाताईंनी सादर केले. प्रमुख अतिथी मालिनीताई यांनी खुप सुंदर आणि विनोदी पद्धतीने विचार मांडले. अध्यक्षांनी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरण पुरक वस्तू वापरायच्या व भरपूर झाडे लावून त्यांचे संगोपन करण्याचा सल्ला दिला. बहारदार सूत्रसंचालन वैशाली ताईंनी केले तर आभार प्रदर्शन सीमा यांनी केले. देशमुख महिला मंडळाच्या २५२ सदस्य असून त्यांचे १२ ग्रुप करण्यात आले आहेत. प्रत्येक ग्रुपला यावेळी साड्यांची नावे देण्यात आली असून या महिन्याची मासिक सभेची जबाबदारी नारायण पेठ ग्रूपकडे होती. मंडळ दर महिन्याला एक सामाजिक उपक्रम राबवित असतो. या महिन्यातील उपक्रम, 'पावसाळ्याची चाहूल लागली की बळीराजा आपल्या कामाला लागतो ' सध्याची परिस्थीती पाहता बऱ्याच शेतकरी कुटुंबांची बिकट अवस्था आहे म्हणूनच मानवीय कर्तव्य समजून मंडळाकडून या महिन्यात शेतकरी गरजू विभा देशमुख या महिलेला शेतात पेरण्यासाठी कपाशीचे बियाणे देण्यात आले व अधिक मासा निमित्त तीची साडी चोळी ,वाण देवून ओटी भरली. राजश्री, प्रिती, निलिमा , मंजू, वैशाली यांनी श्रीकृष्णाची लीला,रासलीला दर्शविणारे नृत्य सादर केले. श्री कृष्णाची भूमिका स्वप्नालीने खूप सुंदररित्या केली. त्यावेळी प्रेक्षक श्री कृष्णाच्या भक्तीत तल्लीन झाले होते.

यावेळी कैरीचे बनवलेले पदार्थ ही स्पर्धा घेण्यात आली.या स्पर्धेच्या विजेत्या शुभांगी आणि मनीषा या होत्या.



ड्रेस कोडचे परीक्षण राजश्री ,सीमा ,मंजू यांनी केले. हौजी गेम स्वप्नाली आणि मंजू यांनी घेतला. चिठ्ठी गेम प्रीति आणि राजश्री यांनी घेतला.ड्रेस कोड च्या विजेत्या अरुणा ,लता, केतकी, पौर्णिमा, अनुजा, वसुधा, जया या होत्या. चिठ्ठी गेमचे बक्षिस अश्विनी ,पल्लवी, अपर्णा,प्रांजली, जयश्री, सोनल, वंदना ताई यांना मिळाले. हौजी गेम स्पर्धेची बक्षिसे किरण ,वंदना, उज्वला, अंजली मीना,रेवती, सुचिता, संध्या, विद्या, ज्योती, कविता,मनिषा,छाया यांना मिळाले.

सर्वात शेवटी सरप्राइज गेम घेण्यात आला.हा गेम प्रीति ,राजश्री, रोहिणी यांनी घेतला. सरप्राइज गेम विजेते वर्षा वाहिनी,स्वप्ना, वर्षा मिलिंद,सिद्धी ताई अंजली या होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी नारायण पेठ च्या सदस्या राजश्री ,स्वप्नाली, वैशाली, रोहिणी,वृषाली आदींनी परिश्रम घेतले.

## ग्रामीण भागातील वीज पुरवठा खंडित

**अकोला :** थोडा जरी पाऊस व वारा सुटला तरी ग्रामीण भागातील वीज पुरवठा बंद करण्यात येत असल्याने ग्रामीण भागातील नागरिक वैतागून गेले आहेत. आम्ही नियमित विज बिलाचा भरणा करीत असल्यानंतरही आम्हाला अखंडित वीज का मिळत नाही, असा प्रश्न ते करीत आहेत. विशेष म्हणजे हा वीज पुरवठा रात्री-बेरात्री केंव्हाही खंडित होत असल्याने ग्रामस्थांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. आखतवाडा, अनकवाडी आणि लगतच्या भागातील नागरिकांची या बाबतीत ओरड झाली.

## आलेगाव येथील अल्पवयीन मुलाच्या खून प्रकरणी तीन आरोपींना 6 तासांत अटक

प्रतिनिधी १५ जून

**आलेगाव :** पातूर तालुक्यातील आलेगाव येथे अल्पवयीन मुलाच्या खूनप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी) आणि चान्नी पोलिसांनी संयुक्त कारवाई करत अवघ्या सहा तासांत तीन आरोपींना अटक केली आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी (दि. १४ जून) आलेगाव येथील वसंतराव नाईक विद्यालयासमोरील शेकापूर फाटा परिसरात यश गजानन गिन्हे (वय १७, रा. आलेगाव) याच्यावर गावातील काही तरुणांनी कौटुंबिक वादातून चाकूने सपासप वार केले. या हल्ल्यात यशचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर आरोपी फरार झाले होते.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक अचिंत चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन पडघन यांनी तातडीने आरोपींचा शोध घेण्याचे आदेश दिले. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखा, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय व चान्नी पोलीस स्टेशन अशी तीन स्वतंत्र पथके तयार करण्यात आली.

तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने चैतन्य जगदीश काळपांडे (वय १९, रा. आलेगाव) व एका १६ वर्षीय विधीसंघर्षग्रस्त बालकाला अमरावती येथे पळून जाण्याच्या तयारीत असताना दर्यापूर रोडवरील आपातापा परिसरातून ताब्यात घेतले. तर या गुन्ह्यातील तिसरा आरोपी जतीन राजेश क्षीरसागर (वय १९, रा. विवरा) याला चान्नी पोलिसांनी अटक केली.

अटक करण्यात आलेल्या आरोपींना पुढील कायदेशीर कारवाई व सखोल तपासासाठी पातूर पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अचिंत चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी व उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन पडघन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर, चान्नी पोलीस स्टेशनचे ठाणेदार गंगाधर दराडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक गोपाल जाधव, निलेश देशमुख, पोउपनि माजीद पठाण तसेच पोलीस कर्मचारी महेंद्र मलिये, वसीमोद्दीन, शेख हारून, रविंद्र खंडारे, अब्दुल गाजीद, किशोर सोनुने, अमोल दिपके, श्रीकांत पातोंड, धीरज वानखेडे, राज चंदेल व चालक मनीष ठाकरे यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

## पाथर्डी येथील ३६ वर्षीय इसम बेपत्ता

**तेल्हारा :** तेल्हारा पोलीस स्टेशनअंतर्गत येणाऱ्या पाथर्डी येथील सचिन शामराव बावणे (३६) हे राहते घरून १२ जून रोजी पहाटे ६.३० वाजेदरम्यान कोणालाही काहीही न सांगता निघून गेले. त्याचा नातेवाईकांकडे व परिसरात शोध घेतला. मात्र तो मिळून आला नाही. अशा आशयाची फिर्याद जया सचिन बावणे (३१) यांनी १३ जून रोजी नोंदविली आहे. सदर इसमाची उंची पाच फूट सात इंच, सडपातळ बांधा, चेहरा लांबट, केस काळे, रंग निमगोरा, दाढी वाढलेली, अंगात निळ्या विटकरी रंगाचे मोठ्या चौकटीचे शर्ट, निळ्या रंगाचा जीन्स पॅन्ट, हनवटीवर गाठ, उजव्या हातावर सचिन जया नाव गोंदलेले आहे. पोलिसांनी मिसिंगची नोंद केली आहे.

# नाईक होमिओपॅथीमध्ये होतोय असाध्य आजारांवर यशस्वी उपचार

### 40 वर्षांत हजारो रुग्ण रोगमुक्त, रुग्णांचे अनुभव

**अकोला :** येथील प्रसिद्ध 'डॉ. नाईक होमिओपॅथी'मध्ये थायरॉईड, लठ्ठपणा, ॲसिडिटी, गुडघेदुखी, कंबरदुखी, आर्थरायटिस (सांधेदुखी) आणि मायग्रेनसारख्या असाध्य आजारांवर उपचार घेऊन रुग्ण आता निरोगी व आनंदी जीवन जगत आहेत. येथील 'ॲडव्हान्स होमिओपॅथी' उपचारांमुळे आतापर्यंत हजारो रुग्णांना मोठा फायदा झाला आहे.

गेल्या ४० वर्षांपासून डॉ. नाईक होमिओपॅथीमध्ये शरीराच्या सर्व आजारांवर संपूर्ण आणि यशस्वी उपचार केले जातात. ज्या रुग्णांना इतर ठिकाणी उपचार घेऊनही काहीही फरक पडलेला नाही, त्यांनी एकदा या केंद्राला नक्की भेट दिली पाहिजे. अधिक माहितीसाठी रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक ९१७५९५७१२९ किंवा ९१३००१६१२९ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधू शकतात, अथवा आणि त्यांच्या Naikhomoeopathy.com (Youtube) युट्युब चॅनेलवरही अधिक माहिती मिळवू शकतात.येथे उपचार घेऊन पूर्णपणे बऱ्या झालेल्या आरती नावाच्या एका महिला रुग्णाने आपला अनुभव शेअर करताना सांगितले.




माझे नांव मिताली, नाईक होमिओपॅथी येथे येण्या अगोदर मला गेल्या १० ते १२ वर्षापासून थायरॉईड चा त्रास होता. वजन वाढले होते, शरिरावर सुज होती. नाईक होमिओपॅथी मध्ये १ महिन्याच्या उपचारानंतर माझे ३ किलो वजन कमी झाले. थायरॉईडचा रिपोर्टही नॉर्मल आला. येथील ॲडव्हॉन्सड् होमिओपॅथी उपचाराने मी ८० टक्के समाधानी आहे.

## स्मार्ट मीटर लावण्यापूर्वी ग्राहकांची संमती घ्या - जावेद जकारिया

प्रतिनिधी १५ जून


**अकोला :** राज्यात सुरू असलेल्या स्मार्ट वीज मीटर बसविण्याच्या प्रक्रियेबाबत ग्राहकांची लेखी संमती घेणे बंधनकारक करावे व ग्राहकांच्या इच्छेविरुद्ध स्मार्ट मीटर बसवू नयेत, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवारचे प्रदेश संघटक सचिव जावेद ज़करिया यांनी केली आहे.

यासंदर्भात जावेद ज़करिया यांनी महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक तसेच मुख्य अभियंता, महावितरण अकोला परिमंडळ यांना ई-मेलद्वारे निवेदन पाठविले आहे. निवेदनात म्हटले की,




राज्यातील अनेक भागांत ग्राहकांची पूर्वसंमती न घेता विद्यमान वीज मीटर बदलून स्मार्ट मीटर बसविण्याचे प्रयत्न होत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. स्मार्ट मीटर बसविण्यापूर्वी ग्राहकांना त्याबाबतची संपूर्ण माहिती देणे, बिलिंग पद्धती समजावून सांगणे आणि त्यांची लेखी संमती घेणे आवश्यक आहे. ज्या ग्राहकांना पोस्टपेड मीटर कायम ठेवायचे आहे, त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची सक्ती करण्यात येऊ नये. ग्राहकांच्या अधिकारांचा सन्मान करून महावितरणने याबाबत स्पष्ट धोरण जाहीर करावे, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. वीज ग्राहकांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी महावितरणने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा ग्राहकांमध्ये वाढत असलेली नाराजी अधिक तीव्र होऊ शकते, असे जावेद ज़करिया यांनी म्हटले आहे.

## कारवाईच्या भीतीने निंबा फाटा व परिसरात खाद्यपदार्थ विक्रेत्यांची प्रतिष्ठाने बंद !



प्रतिनिधी १५ जून

**हातरुण :** अन्न आणि औषध प्रशासनाने खाद्यपदार्थ उत्पादक आणि विक्रेत्यांविरोधात सुरू केलेल्या धडक तपासणी मोहिमेमुळे बाळापूर शहरासह 'व बाळापुर तालुक्यातील निंबा फाटा संपूर्ण तालुक्यात मोठी खळबळ उडाली आहे. तर अन्न व प्रशासन विभागाने वाडेगाव येथील एका डेअरीवर कार्यवाई करण्यात आली व तसेच

बाळापुरात हि जारवाई करण्यात आली त्यामुळे कारवाईच्या भीतीने काही व्यावसायिक काही काळ गायब झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

अन्न व प्रशासन विभागाकडून बाळापूर शहरात भेसळयुक्त पदार्थ विकणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यासाठी प्रशासनाकडून नमुने गोळा केले जात आहेत. मात्र, या कारवाईची कुणकुण लागताच निंबा फाटा येथे बऱ्याच व्यवसायिकांनी सोमवारी दिनांक १५ जुन रोजीसकाळी आपली प्रतिष्ठाने आणि दुकाने काही काळ पूर्णपणे बंद ठेवून पळ काढल्याचे चित्र पहायला मिळाले.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ ५२२६
मॉं. गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय
गायत्री नगर. अकोला
आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!
वैशिष्ट्ये :
- अनुभवी शिक्षकवृंद
- सुसज्ज पायाभूत ईमारत
- दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
- सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
- आनंददायी शिक्षण पध्दती
- CCTV ची सुविधा
- कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
- सुसज्ज प्रयोगशाळा

इयत्ता १ ली ते १० वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
- इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
- इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
- शालेय पोषण आहार



मॉं गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. ९९२११८६७१५, ९५११२५४९५९, ९४२१८९५७९०, ९९६०४३७३६६

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
सोमवार, दि. १५ जून २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# भेसळयुक्त खाद्यतेलाचा वापर ?

## नागरिकांच्या आरोग्याबाबत चिंता, तपासणीची मागणी

प्रतिनिधी १५ जून

**उमरखेड :** उमरखेड शहर व परिसरातील हॉटेल्स, रेस्टॉरंट्स तसेच खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या विविध आस्थापनांमध्ये निकृष्ट दर्जाचे अथवा भेसळयुक्त खाद्यतेल वापरले जात असल्याच्या चर्चेमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित विभागांनी तातडीने कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

स्थानिक स्तरावर व्यक्त होत असलेल्या आरोपांनुसार, काही ठिकाणी खाद्यपदार्थ तळण्यासाठी वापरलेले तेल वारंवार गरम करून वापरले जात असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसेच अधिक नफा मिळविण्याच्या उद्देशाने स्वस्त व निकृष्ट दर्जाच्या तेलाचा वापर होत असल्याबाबतही संशय व्यक्त करण्यात येत आहे. तथापि, या आरोपांची अधिकृत पुष्टी झालेली नाही.

### अन्न व औषध प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्न

- जिल्ह्यातील भेसळखोरी रोखण्याची जबाबदारी असलेल्या अन्न व औषध प्रशासनाच्या कार्यप्रणालीवरही काही नागरिकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. भेसळविरोधी कारवाया अधिक प्रभावीपणे राबवून नियमित नमुना तपासणी आणि अचानक तपासणी मोहिमा हाती घेण्याची गरज व्यक्त केली जात आहे. तथापि, या संदर्भातील आरोपांबाबत संबंधित विभागाची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही.

नागरिकांच्या मते, अशा प्रकारांमुळे पचनविकार, हृदयविकार तसेच इतर आरोग्यविषयक समस्या उद्भवू शकतात.

त्यामुळे शहरातील तसेच महामार्गालगतच्या हॉटेल्स, ढाबे आणि रेस्टॉरंट्समधील खाद्यतेलाचे नमुने घेऊन त्यांची प्रयोगशाळेत तपासणी करावी, अशी मागणी पुढे आली आहे.

या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासन (एफडीए) तसेच नगरपालिकेच्या आरोग्य विभागाने संयुक्त तपासणी मोहीम राबवून खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेची पडताळणी करावी, असे नागरिकांचे म्हणणे आहे. दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करण्यात यावी, अशीही मागणी होत आहे.

दरम्यान, सार्वजनिक आरोग्याशी संबंधित या विषयाकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहून वस्तुस्थिती समोर आणावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षणाची नवी दिशा; भारतीय जैन संघटनेतर्फे पुण्याला रवाना



प्रतिनिधी १५ जून

**यवतमाळ :** आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांतील मुलांच्या शैक्षणिक पुनर्वसनासाठी भारतीय जैन संघटनेने (बीजेएस) पुढाकार घेत जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना पुणे येथे उच्च शिक्षणासाठी रवाना केले.

वाघोली (पुणे) येथील शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्पाअंतर्गत या विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण, निवास व इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

संस्थापक शांतीलाल मुथा यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमांतर्गत यवतमाळ जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील विद्यार्थ्यांना इयत्ता पाचवी ते बारावीपर्यंतचे शिक्षण विनामूल्य दिले जाणार आहे. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांतील मुलांचे शिक्षण आर्थिक अडचणींमुळे खंडित होऊ नये, या उद्देशाने राज्यभरातील विद्यार्थ्यांना दत्तक घेऊन त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी संघटनेने स्वीकारली आहे.

शेतीतील अनिश्चितता, नापिकी, कर्जबाजारीपणा आणि इतर आर्थिक संकटांमुळे अडचणीत आलेल्या शेतकरी कुटुंबांना आधार देण्याचा हा प्रयत्न असल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी पुणे येथील विकास बहुले आणि विकास लोणकर यांनी यवतमाळला भेट देऊन प्रवेश प्रक्रियेला गती दिली. जिल्हा समन्वयक डॉ. शेखर बंड, मूल्यवर्धन जिल्हा समन्वयक मनीष बनसोड, विजय चुंबळे आणि श्रद्धा सोईतकर यांनी विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन केले.

या उपक्रमासाठी भारतीय जैन संघटनेचे विदर्भ अध्यक्ष संदीप मुनोत, विदर्भ सचिव डॉ. शेखर बंड, विदर्भ कार्यकारिणी सदस्य महेंद्र बोरा, दिलीप रेदासनी, कीर्ती मुथा, वंदना बोरुंदिया, जिल्हाध्यक्ष सुशील कटारिया, विनय मुनोत, रूपेश भंडारी, डॉ. सारिका शहा, विजय चुंबळे, श्रद्धा सोईतकर यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांनी योगदान दिले.

# तलावात पोहताना युवक बुडाला; मृतदेहाचा शोध आजही सुरु

प्रतिनिधी १५ जून

**यवतमाळ :** वडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कोळंबी येथील तलावात पोहताना एका ३० वर्षीय युवकाचा बुडून मृत्यू झाल्याची घटना रविवारी सायंकाळी घडली. मृतदेह अद्याप सापडला नसून त्याच्या शोधासाठी सोमवारी सकाळी शोध व बचाव पथकाची मदत घेण्यात येणार आहे. पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, कोळंबी परिसरातील तलावाजवळ रविवारी काही तरुणांनी एकत्र येऊन पार्टी केली होती. त्यानंतर काही जण तलावात पोहण्यासाठी उतरले. यावेळी राजू पुंजाराम कोडापे (वय ३०, रा. कोळंबी) हा सायंकाळी सुमारे पाच वाजण्याच्या सुमारास पाण्यात बुडाला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक व पोलीस घटनास्थळी दाखल झाले. मात्र अंधार पडल्याने शोधमोहीम मर्यादित स्वरूपात राबविण्यात आली. रात्री उशिरापर्यंत मृतदेहाचा शोध लागला नव्हता. दरम्यान, युवकाचा मृतदेह शोधण्यासाठी सोमवारी सकाळी विशेष शोध व बचाव पथकाला पाचारण करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या घटनेमुळे कोळंबी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# शबाना सोलंकी यांना ‘कर्तृत्ववान महिला पुरस्कार’

प्रतिनिधी १५ जून




**आर्णी :** समाजसेवा, व्यवसाय, कला आणि सार्वजनिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल श्रीमती शबाना युनूस सोलंकी यांना ‘कर्तृत्ववान महिला पुरस्कार’ प्रदान करण्यात आला. यवतमाळ येथील उत्सव मंगल कार्यालयात १३ जून रोजी झालेल्या कार्यक्रमात SVPC फाउंडेशन महाराष्ट्राच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.

शबाना सोलंकी या विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत असून महिला सक्षमीकरणासाठी सातत्याने कार्यरत आहेत. व्यवसाय, कला तसेच सामाजिक क्षेत्रात त्यांनी केलेल्या कार्यामुळे त्या अनेक महिलांसाठी प्रेरणास्थान ठरल्या आहेत. त्या भारतीय जनता पक्षाच्या जिल्हा पदाधिकारी म्हणूनही कार्यरत आहेत. विविध क्षेत्रांतील योगदानाची दखल घेत SVPC फाउंडेशन महाराष्ट्रने त्यांची आर्णी तालुक्यातील ‘कर्तृत्ववान महिला’ म्हणून निवड केली. भविष्यातही महिला व युवतींना प्रोत्साहन देण्याचे कार्य त्यांच्या माध्यमातून अधिक व्यापक होईल, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

सोलंकी यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल आर्णी शहरासह परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून विविध स्तरांतून त्यांच्या कार्याचे कौतुक करण्यात येत आहे.

# डोंगरखर्डा येथील आरोग्य पथकाला रिक्त पदांचा आजार

प्रतिनिधी १५ जून

**कळंब :** डोंगरखर्डा येथील आरोग्य पथकाकडे आरोग्य प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने परिसरातील १३ गावातील नागरिकांना आणि गरीब रुग्णांना आरोग्य सेवेसाठी मोठा त्रास सहन करावा लागत आहे. प्रशस्त इमारत आणि आवश्यक सुविधा उपलब्ध असतानाही एक डॉक्टर, एक नर्स आणि तीन चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याने या पथकाची आरोग्यसेवा विस्कळीत झाली आहे.

हवामानातील बदलामुळे साथीच्या आजारांचे प्रमाण वाढत असल्याने डोंगरखर्डा आरोग्य पथकात दररोज विविध गावातील रुग्ण उपचारासाठी येतात. मात्र, डॉक्टरांच्या अभावामुळे रुग्णांना योग्य व वेळेवर उपचार मिळत नसल्याचा सांगितले जाते. अनेक वर्षांपासून या पथकाला कायमस्वरूपी वैद्यकीय अधिकारी मिळालेला नाही.

खोरद, कुसळ, मुसळ, रूढा, मजरा, झाडकिन्ही, पिंपळशेंडा, किनवट, तिधरी, कैलासपोड, कुंभीपोड, अंतरगाव, डोंगरखर्डा आदी गावातील नागरिक आरोग्य सेवेसाठी या पथकावर अवलंबून आहेत.

मात्र, योग्य उपचार न मिळाल्याने रुग्णांना नाइलाजाने कळंब, राळेगाव किंवा इतर ठिकाणी जावे लागते. त्यामुळे त्यांना आर्थिक भुर्दंड बसतो, वेळ आणि मजुरीचेही नुकसान होत आहे. आरोग्य पथकात तातडीने पूर्णवेळ वैद्यकीय अधिकारी नियुक्त करावा, रिक्त पदे भरून आरोग्य सेवा सक्षम करावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

# चार वर्षांपासून भत्ते रखडले; ग्रामरोजगार सेवक आर्थिक संकटात

## कर्मचारी प्रवास व अल्पोपहार भत्त्यांच्या प्रतीक्षेत

प्रतिनिधी १५ जून

**उमरखेड :** उमरखेड तालुक्यात कार्यरत ग्रामरोजगार सेवकांचे प्रवास भत्ता व अल्पोपहार भत्ते गेल्या चार वर्षांपासून प्रलंबित असल्याने संबंधित कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण आहे. विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या ग्रामरोजगार सेवकांवर आर्थिक संकट ओढवले असून, काहींवर उपासमारीची वेळ आल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) तसेच ग्रामपंचायत स्तरावरील विविध विकासकामांच्या अंमलबजावणीत ग्रामरोजगार सेवकांची महत्त्वाची भूमिका असते. कामानिमित्त त्यांना वारंवार गावोगावी तसेच पंचायत समिती कार्यालयात जावे लागते. मात्र त्यासाठीचा प्रवास खर्च स्वतःच्या खिशातून करावा लागत असून, शासनाकडून देय असलेले प्रवास व अल्पोपहार भत्ते चार वर्षांपासून मिळाले नसल्याची माहिती समोर आली आहे.

प्रलंबित भत्त्यांबाबत संबंधित विभागाकडे वारंवार पाठपुरावा करूनही प्रश्न मार्गी लागलेला नसल्याचा आरोप ग्रामरोजगार सेवकांनी केला आहे. वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर नियमित खर्च भागविताना अडचणी येत असल्याने कर्मचाऱ्यांची आर्थिक कोंडी होत असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रशासनाने तातडीने दखल घेऊन प्रलंबित भत्त्यांचे वितरण करावे, अशी मागणी ग्रामरोजगार सेवकांकडून करण्यात आली आहे. अन्यथा संघटनेच्या माध्यमातून आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

दरम्यान, संबंधित अधिकाऱ्यांनी या प्रकरणाचा शासनस्तरावर पाठपुरावा सुरू असल्याचे सांगितले आहे. निधी उपलब्ध होताच प्रलंबित भत्त्यांचे वितरण करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले आहे. मात्र चार वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या ग्रामरोजगार सेवकांना प्रत्यक्षात भत्ते कधी मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार : शेतकऱ्यांसाठी वरदान - ना.संजय राठोड

प्रतिनिधी १५ जून



**यवतमाळ :** पर्यावरण वाचवण्यासाठी आणि भूजल पातळी टिकवण्यासाठी पाऊसाचं पाणी अडवणं आणि जमिनीत मुरवण,हेच आजच्या काळातील सर्वात मोठी गरज आहे. दिवसेंदिवस भूगर्भातील पाणी पातळी खाली खाली जात आहे.

पावसाचं वाहून जाणारं पाणी अडवून भूगर्भात मुरवणं आणि वाहून जाणारी माती थांबवणं ही काळाची गरज आहे. यासाठी प्रत्येक नागरिकाने आणि शासनाने एकत्र येऊन काम करणं गरजेचं आहे, असं आवाहन मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी केलं आहे.

महाराष्ट्र शासनाने जलसंधारणासाठी स्वतंत्र "मृद व जलसंधारण विभाग" निर्माण केला आहे. गेल्या काही वर्षांपासून या विभागामार्फत राज्यभर भरीव काम सुरू आहे. सध्या या विभागाची धुरा माझ्याकडे आहे. आम्ही "गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार" ही महत्त्वाकांक्षी मोहीम हाती घेतली आहे, अशी माहिती मंत्री राठोड यांनी दिली. मंत्री ना. राठोड म्हणाले, "आपल्या तलावांमध्ये, बंधाऱ्यांमध्ये, धरणांमध्ये गेल्या कांही वर्षांपासून भरपूर गाळ साचला आहे. हा गाळ म्हणजे शेतकऱ्यांसाठी सोनं आहे. हा नैसर्गिक कंपोस्ट खत आहे. जर आपण धरणातील हा गाळ काढून शेतात टाकला, तर दोन फायदे होतात. धरणातील गाळ निघाल्यामुळे धरणात अधिक पाणी साठतं आणि ते अधिक दिवस टिकतं.

तर हा गाळ शेतात टाकल्याने जमिनीची सुपीकता वाढते, उत्पादन वाढतं आणि शेतकरी सुखी होतो."

### सगळ्यांनी सहभाग घ्यावा

- मंत्री राठोड यांनी पुढे सांगितले की, "छोटे-छोटे बंधारे बांधणं, नाल्यांचं खोलीकरण-रुंदीकरण करणं, पावसाचं पाणी अडवणं ही कामं आज राज्यभर सुरू आहेत. पण हे काम फक्त शासनाचं नाही, समाजाचंही आहे. प्रत्येक गावाने, प्रत्येक शेतकऱ्याने या मोहिमेत सहभाग घ्यावा. आपण जर आज पाणी अडवलं, माती अडवली, तर उद्याची पिढी आपल्याला धन्यवाद देईल." "पर्यावरण वाचवायचं असेल, शेतकऱ्यांच्या जीवनात आनंद आणायचा असेल, तर जलसंधारणाशिवाय पर्याय नाही.", असे संजय राठोड यांनी शेवटी म्हटले आहे.

# ओबीसी जनजागृती मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## जातवार जनगणना, सामाजिक न्याय व हक्कांबाबत मार्गदर्शन

प्रतिनिधी १५ जून



**दिग्रस :** राष्ट्रीय पिछडा वर्ग (ओबीसी) मोर्चाच्या जनजागृती मोहिमेअंतर्गत कांदळी (ता. दिग्रस) येथे आयोजित मार्गदर्शन कार्यक्रमाला परिसरातील ओबीसी समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ओबीसी समाजाच्या विविध प्रश्नांवर यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.

राष्ट्रीय पिछडा वर्ग ओबीसी मोर्चाचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष तथा जिल्ह्यातील नेते गजानन उल्हे यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवारी (ता. १३) हा कार्यक्रम पार पडला. त्यांनी ओबीसींची जातवार जनगणना, सामाजिक न्याय, शैक्षणिक व राजकीय हक्क तसेच समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी संघटनात्मक बळकटीची गरज याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांच्या विचारांना उपस्थितांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महादेवराव काळबांडे यांनी केले, तर प्रास्ताविक प्रदीप चोपडे यांनी केले. यावेळी दत्ताभाऊ मेकवाड, सागर महिंद्रे (पाटील), दिलीप जवादे, राजेंद्र इरतकर, प्रा. मोरेश्वर उईके, काटकर यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

कांदळीसह डेहणी, कलगाव आणि परिसरातील गावांमधून मोठ्या संख्येने ओबीसी समाजबांधवांनी कार्यक्रमाला उपस्थिती दर्शविली. कार्यक्रमाच्या माध्यमातून समाजातील संघटनात्मक एकजूट वाढण्यास आणि हक्कांविषयी जागरूकता निर्माण होण्यास मदत होईल, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महादेवराव काळबांडे यांनी विशेष परिश्रम घेतल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# मोफत आरोग्य शिबिरात २,५६० रुग्णांची तपासणी

प्रतिनिधी १५ जून






## पालकमंत्री राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**दिग्रस :** राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य मोफत आरोग्य शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ‘आरोग्य संकल्प अभियान’ अंतर्गत झालेल्या या शिबिरात तब्बल २ हजार ५६० रुग्णांनी विविध वैद्यकीय सेवांचा लाभ घेतला.

मा. आरोग्य सेवा समिती, यवतमाळ यांच्या वतीने तसेच दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था, सावंगी (मेघे) आणि आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने दिनबाई विद्यालय, दिग्रस येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन शिवसेना पश्चिम विदर्भ सहसंपर्कप्रमुख पराग पिंगळे यांच्या हस्ते झाले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख यशवंत पवार, जीवन पाटील यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

शिबिरात हृदयरोग, कर्करोग, स्त्रीरोग, बालरोग, त्वचारोग, अस्थिरोग, नेत्ररोग, कान-नाक-घसा विकार, श्वसनरोग, मानसिक आजार, न्यूरो विकार, दंत व मुखरोग तसेच मूत्ररोग यांसह विविध आजारांवरील मोफत तपासणी व उपचार करण्यात आले. महिलांसाठी मेमोग्राफी, पॅप स्मिअर, कर्करोग तपासणी, बंध्यत्व तपासणी, व्हेरिकोज वेन्स तपासणी, किडनी तपासणी आणि ईसीजीसह विविध चाचण्यांची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली.

तपासणीनंतर गरजूंना पुढील उपचार व शस्त्रक्रियांसाठी मार्गदर्शन करण्यात आले. अनेक रुग्णांना आयुष्मान भारत योजनेअंतर्गत उपचार मिळण्यासाठी आवश्यक माहिती व नोंदणीची सुविधा देण्यात आली.

यावेळी बोलताना पराग पिंगळे यांनी पालकमंत्री संजय राठोड यांच्या समाजसेवा व रुग्णसेवेतील योगदानाचा गौरव केला. तर यशवंत पवार यांनी राठोड हे जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होणारे लोकप्रतिनिधी असल्याचे सांगितले.

दिग्रस, दरव्हा आणि नेर विधानसभा मतदारसंघातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांसाठी हे शिबिर मोठा आधार ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी शिवसेनेचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, युवासेना कार्यकर्ते, रुग्णसेवक आणि शिवसैनिकांनी परिश्रम घेतले.

# चंद्रकला पानसे यांचा ‘कर्तृत्ववान महिला पुरस्कार २०२६’ने गौरव

प्रतिनिधी १५ जून




**कळंब :** तालुक्यातील डोंगरखर्डा येथील सामाजिक कार्यकर्त्या सौ. चंद्रकला गणेशराव पानसे (बर्डे) यांना सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल ‘कर्तृत्ववान महिला पुरस्कार २०२६’ प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

जागृती विकास परिवर्तन प्रतिष्ठान यांच्या वतीने सामाजिक, शैक्षणिक, व्यावसायिक तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा दरवर्षी गौरव करण्यात येतो. यंदा राज्यभरातील निवडक महिलांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती. यवतमाळ येथील उत्सव मंगल कार्यालयात आयोजित समारंभात पुरस्कार वितरण सोहळा पार पडला.

यावेळी मिस एशिया वर्ल्ड २०२५ विजेत्या गायत्री रोहनकर यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सौ. पानसे यांचा गौरव करण्यात आला.

सौ. पानसे गेल्या १५ ते २० वर्षांपासून कळंब तालुक्यात सामाजिक क्षेत्रात कार्यरत असून गोरगरीब, गरजू, दिव्यांग, अनाथ तसेच शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांच्या मदतीसाठी सातत्याने कार्य करत आहेत. त्यांच्या या सामाजिक बांधिलकीची दखल घेत विविध सामाजिक संस्था तसेच सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते त्यांना यापूर्वीही अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

त्यांच्या या सन्मानाबद्दल परिसरातून अभिनंदन करण्यात येत असून सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या कार्याचे कौतुक होत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

सोमवार दि १५ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## वाहतूक पोलिसांच्या सतर्कतेने चोरीचा ऑटो जेरबंद; मालेगाव येथे कारवाई

**मालेगाव :** मालेगाव पोलीस ठाण्याच्या वाहतूक शाखेच्या सतर्कतेमुळे अनेक वर्षांपासून चोरीच्या गुन्ह्यात शोधात असलेला एक तिनचाकी ऑटो रिक्षा जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई रविवारी (दि. १४ जून) मालेगाव-मेहकर मार्गावरील मेहकर बायपास येथे करण्यात आली.

मालेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार महेश यलगया जाधव व उमेश म्हस्के हे अवैध वाहतुकीवर कारवाई करीत असताना त्यांना एमएच २८ टी ३८८४ क्रमांकाचा एक संशयास्पद ऑटो मेहकरकडून येताना आढळला. संशय आल्याने त्यांनी वाहन थांबवून चालान मशीनद्वारे वाहनाची माहिती तपासली. तपासणीदरम्यान प्रत्यक्ष वाहनाची माहिती आणि ऑनलाइन नोंदीतील तपशीलामध्ये तफावत आढळून आली. यानंतर वाहनचालक शेख सोहेल शेख शकील (वय २४ वर्षे, रा. मेहकर, ता. मेहकर, जि. बुलढाणा) यास वाहनासह ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणण्यात आले. पुढील चौकशीत संबंधित वाहनाविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून वाहन जप्त करण्यात आले आहे.



# भ्रष्टाचाराची सवय जडली, ट्रॅक्टरची किंमत वाढली!


सिटी न्यूज वाशीम

गोटपॉक्स लसीकरणासाठी ३७.५२ लाख लसमात्रांचे वाटप सुरू

समाजकल्याण नव्हे, अधिकाऱ्यांचे स्व-कल्याण!

सिटी न्यूज वाशीम

अधिकाऱ्याची 'मनमानी', दररोज पाहिजे 'दानापाणी'!

समाजकल्याण विभागाच्या मिनी ट्रॅक्टर खरेदी प्रकरणात लालची अधिकाऱ्याचे हात 'बरबटलेले'

## समाजकल्याण विभागातील 'कथित' अधिकाऱ्याची अफलातून मागणी

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

वाशीम जिल्ह्यातील एस.सी.व एस.टी. प्रवर्गातील ५० महिला बचत गटाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासनाने मिनी ट्रॅक्टर देण्याचा स्तुत्य निर्णय घेतला.परंतु येथील 'कथित' अधिकाऱ्याने त्याच्या दलालीच्या रक्कमेच्या हव्यासापोटी संगनमतात सहभागी असलेल्या छत्रपती संभाजीनगरच्या विक्रेत्याने मिनी ट्रॅक्टरची किंमत वाढवून लालची अधिकाऱ्याला लाखो रूपयाचा मलिदा वाटल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे.

समाज कल्याण विभागामार्फत महिला बचत गटाच्या सक्षमीकरणासाठी शासनाकडून विविध योजनेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात अनुदान मिळते. त्या योजना प्रभावीपणे राबवून बचत गटातील सर्व महिलांना फायदा व्हावा आणि त्यांचे आर्थिक जीवनमान उंचावण्यासाठी समाज कल्याण विभागातील जबाबदार अधिकाऱ्यांनी पुढाकार घेण्याची आवश्यक्ता आहे.परंतु वाशीम येथील कार्यरत लालची अधिकाऱ्याने स्व-कल्याणासाठी वाशीम व परिसरातील विविध कंपनीच्या ट्रॅक्टर विक्रेत्यांना डावलून चक्क २५० किलोमीटर दूर असलेल्या छत्रपती संभाजीनगरमधील 'मॅसे फर्ग्यूसन' कंपनीच्या विक्रेत्यासोबत संगनमत करून


मिनी ट्रॅक्टरची किंमत वाढवून स्वत:चे उखळ पांढरे करून घेतल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस

आला आहे. छत्रपती संभाजीनगरच्या ट्रॅक्टर विक्रेत्याने एका मिनी ट्रॅक्टरची किंमत ३ लाख ८० हजार लावून लालची अधिकाऱ्याला एका ट्रॅक्टरमागे २५ ते ३० हजार रूपयाप्रमाणे लाखो रूपयाचे 'गिफ्ट' म्हणून दिल्याची समाजकल्याण विभागात चर्चा आहे.वाशीम जिल्ह्यातील एस.सी.व एस.टी. प्रवर्गातील पात्र असलेल्या महिला बचत गटाने त्यांच्या हिस्याची १० टक्के रक्कम विक्रेत्याच्या खात्यात जमा केल्याचे समजते.तसेच समाज कल्याण विभागाने सर्व महिला बचत गटाच्या खात्यामध्ये ९० टक्के रक्कमेतील ५० टक्के रक्कम जमा केल्याचे वृत्त आहे. आणि उर्वरित ५० टक्के रक्कम मिनी ट्रॅक्टर बचत गटाला मिळाल्यानंतर त्यांच्या बचत खात्यात जमा होणार असल्याचे समजते.

मिनी ट्रॅक्टर घेणाऱ्या महिला बचत गटाला छत्रपती संभाजीनगरला सेवा व दुरूस्तीसाठी ये-जा करणे सोयीचे नर्सेल्याने अमरावती विभागीच्या समाज कल्याण आयुक्तांनी 'हा' मिनी ट्रॅक्टर खरेदीचा लालची अधिकाऱ्याने स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी केलेला व्यवहार त्वरीत रद्द करून वाशीम जिल्ह्यातील एस.सी.व एस.टी.प्रवर्गातील ५० महिला बचत गटांना न्याय द्यावा,दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी .अशी विविध स्तरातून मागणी होत आहे.

## थोडक्यात

### शिवसेना पक्षाचे उपतालुकाप्रमुख सर्कल प्रमुख जाहीर!



●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

वाशीम -शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपतालुकाप्रमुख सर्कल प्रमुख जाहीर करण्यात आले तोंडगाव आडोळी उपतालुका प्रमुख पदी दीपक इडोळे, तोंडगाव सर्कल प्रमुख पदी संजू भाऊ ठोंबरे ,कळंबा महाली सर्कल प्रमुख पदी विनोद वारकड यांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी बैठकीच्या अध्यक्षस्थानी शिवसेना जिल्हाप्रमुख बालाजी वानखेडे ,जिल्हा संघटक गजाननराव देशमुख, विधानसभा संघटक पांडुरंग पांढरे ,प्रभारी तालुकाप्रमुख गजानन जैताडे, उपतालुकाप्रमुख ,वसुदेव भुसारी ,राजेश बोडखे, सर्कल प्रमुख निरंजन गावंडे, दिलीप शिंदे ,आनंदा काळे, माणिक कव्हर ,शंकर सावके ,संतोष माने, दादाराव धनगर, रमेश घुगे, संजय ठोंबरे ,विनोद वारकड, निलेश वानखेडे ,मनोज खडसे इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

### सेवापूर्ती धम्म संघाच्या वतीने पंचशील नगर येथे ११ जून पासून सुरूवात



●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

स्थानिक पंचशील नगर येथील निळ वादळ बुद्ध विहार येथे सेवापूर्ती धम्म संघाच्या वतीने दहा दिवशीय धम्म संस्कार शिबिराला दि.११ जून पासून सुरूवात झालेली आहे.हे धम्म संस्कार शिबीर दि.११ जून ते २० जून या कालावधीत होणार असून धम्म संस्कार शिबीराचे आयोजन सेवापूर्तीचे से.नि. उपमुख्यकार्यकारी अधिकारी विलास खिल्लारे,से.नि.कृषी अधिकारी दिलीप कंकाळ, अशोक ताजणे, नारायण जाधव, से.नि.शिक्षक अरविंद एस.पडघान, से.नि.केंद्रप्रमुख दिलीप गवई, बाळासाहेब भगत,अनिल वानखेडे, जमदाडे,एड.भास्कर इंगळे, प्रकाश इंगळे, शिवाजी पडघान, सुभाष अंभोरे यांचेसह सेवापूर्ती धम्म संघाच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## रिसोड मार्केट कमिटी भूखंड घोटाळा उघडकीस आला, पण...

# अधिकारी व पदाधिकाऱ्यांवर कारवाई कधी!

●खाजा शेख @ रिसोड●

अकरा भूखंडांच्या वाटपातील अनियमिततेवर पणन संचालनालयाने शिक्कामोर्तब करत घोटाळा सिद्ध केला; मात्र दोषी अधिकारी व पदाधिकाऱ्यांवर कारवाईचा हात अद्याप पडलेला नाही. चौकशी पूर्ण, निष्कर्ष स्पष्ट, तरीही शिक्षेची प्रक्रिया ठप्प असल्याने 'घोटाळा सिद्ध झाला, पण कारवाई कधी?' असा सवाल आता सर्वसामान्य जनतेतून उपस्थित केला जात आहे. रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीतील कथित भूखंड घोटाळ्यावर पणन संचालनालयाने शिक्कामोर्तब केल्यानंतर आता सर्वसामान्यांच्या मनात एकच प्रश्न उपस्थित होत आहे – घोटाळा सिद्ध झाला, पण संबंधित अधिकारी आणि पदाधिकाऱ्यांवर कारवाई होणार कधी?

चौकशी अहवालानुसार अकरा भूखंडांचे वाटप करताना नियमांना हरताळ फासण्यात आला. वरिष्ठ अधिकाऱ्यांची दिशाभूल करून स्वतःच्या स्वार्थासाठी आणि आर्थिक लाभाच्या उद्देशाने संबंधित अधिकारी व संचालक मंडळाने




अधिकारांचा गैरवापर केल्याचे निष्पन्न झाले. मात्र, इतके गंभीर निष्कर्ष समोर आल्यानंतरही दोषींवर नेमकी कोणती कारवाई होणार, याबाबत अद्याप स्पष्टता नाही.सहकार, खरेदी-विक्री संस्था, बाजार समित्या किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांमधील अनेक घोटाळे यापूर्वीही उघडकीस आले. चौकशा झाल्या, अहवाल तयार झाले; पण शिक्षेचे प्रमाण अत्यल्पच राहिले. त्यामुळे भ्रष्टाचार करणाऱ्यांच्या मनातील कायद्याची भीती कमी होत गेली, अशी चर्चा नागरिकांमध्ये होत आहे.रिसोड मार्केट कमिटी प्रकरणात तर आश्चर्याची परिसीमा गाठल्याचे बोलले जात आहे. ज्या जागेवर अनेक वर्षांपासून टीव्ही सेंटर अस्तित्वात आहे, तीच जागा 'खुली' असल्याचे दाखवून वरिष्ठांची दिशाभूल करण्यात आली. संपूर्ण तालुका आणि जिल्ह्याला वास्तव माहिती असताना असा दावा करण्याचे धाडस संबंधित सचिव आणि संचालक मंडळाने कसे केले, हा प्रश्न उपस्थित होत आहे.कायद्याची, चौकशीची किंवा भविष्यातील कारवाईची भीती त्यांना वाटली नाही का? याचे उत्तर शोधताना एकच गोष्ट समोर येते भ्रष्टाचार उघडकीस यायला अनेक वर्षे लागतात आणि उघडकीस आलाच तरी शिक्षेचे प्रमाण अत्यल्प असते. त्यामुळे 'काहीही झाले तरी आपण वाचणार' अशी मानसिकता अनेक ठिकाणी बळावत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.आज गरज आहे ती कठोर कारवाईची. केवळ चौकशी अहवालांपुरते प्रकरण मर्यादित न राहता दोषींवर गुन्हे दाखल होऊन त्यांना कायदेशीर शिक्षा झाली पाहिजे. तेव्हाच सहकार क्षेत्र, बाजार समित्या, खरेदी-विक्री संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्थांबाबत जनतेचा विश्वास टिकून राहू शकेल.

### सगळ्यांनी पाहिलं उघड्या डोळ्यांनी; पण दाखवलं रिकामं कागदांमधूनच त्यांनी...

ज्या संचालक मंडळाने आणि सचिवाने टीव्ही सेंटर असलेली जागा 'खुली जागा' म्हणून दाखवली, त्यांनी संपूर्ण तालुका आणि जिल्ह्यातील नागरिकांना विचार करण्यास भाग पाडले आहे. त्यामुळेच नागरिकांमध्ये एक उपरोधिक चर्चा रंगत आहे – 'या संचालकांचे आणि सचिवांचे काळीज निश्चितच वाघाचे असावे!'कारण एवढे धाडस करताना त्यांना ना कायद्याची भीती वाटली, ना वरिष्ठांची. आता भ्रष्टाचार सिद्ध झाल्यानंतर त्यांना शिक्षा होण्यासाठी आणखी किती काळ लागणार, याचीच उत्सुकता शहरात चर्चेचा विषय ठरत आहे.

### चौकशी झाली पूर्ण; कारवाई मात्र अद्याप शून्य...

जर चौकशीअंती संचालक मंडळ आणि सचिव यांच्या संगनमताने भ्रष्टाचार झाल्याचे निष्पन्न झाले असेल, तर पुढचा टप्पा म्हणजे शिक्षेचा आदेश. दोषींवर गुन्हे दाखल होऊन त्यांना शिक्षा झाल्यास शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांचा व्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ होईल.भ्रष्टाचार सिद्ध करण्यासाठी प्रशासनाला वर्षानुवर्षे लागतात; पण शिक्षा होण्यासाठीही तितकाच विलंब झाला, तर न्यायव्यवस्थेवरील जनतेचा उरलेसुरला विश्वास डळमळीत होऊ शकतो. भ्रष्टाचार हा जरी असाध्य वाटणारा रोग असला, तरी त्यावर उपचार करणारा 'डॉक्टर' व्यवस्थेमध्ये असतोच, हे दाखवून देण्याची वेळ आता आली आहे.रिसोड मार्केट कमिटी प्रकरणाचा शेवट केवळ चौकशी अहवालावर न होता, दोषींवर कठोर आणि उदाहरणात्मक कारवाईत झाला तरच भविष्यात अशा प्रकारच्या घोटाळ्यांवर प्रभावी अंकुश बसू शकेल.

## भगवंता, काय लावली चिंता, पाऊस येवू दे..!

# पावसासाठी भगवंताकडे साकडे!



●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

**धोंडी धोंडी पाणी दे..**
**हलकी हलकी ज्वारी दे..**
**धोंडीचं पाणी मोठ हिवसं..**
**भगवंता काय लावली चिंता**
**पाऊस येवू दे..!**

दरवर्षी मृग नक्षत्रात पडणारा पाऊस अजुन जिल्ह्यात पडला नाही. त्यामुळे या पावसाची शेतकरी चातकाप्रमाणे वाट पाहत आहेत. त्यामुळे पावसाच्या हुलकावणीने जिल्ह्यातील बळीराजा चिंतातूर झाला आहे.



पावसासाठी बळीराजाने भगवंताकडे साकडे घालायला सुरूवात केली आहे.

यावर्षी जिल्ह्यातील काही भागात रोहिणी नक्षत्रात अवकाळी पाऊस आला होता. त्यामुळे गत वर्षी प्रमाणे याही वर्षी मृगनक्षत्रात पावसाच्या सरी येतील. या अपेक्षेने शेतकऱ्यांनी पेरणी पूर्वीचे सर्व कामे पुर्ण करुन घेतली.

जिल्ह्यामध्ये बियाणे व रासायणिक खताची टंचाई असतांना देखील शेतकऱ्यांनी आर्थिक तडजोड करुन पेरणी साठी अव्वाच्या सव्वा भावात बियाणे व रासायनिक खताची खरेदी केली.मात्र पावसाने शेतकऱ्यांच्या स्वप्नावर पाणी फिरविले. मृग नक्षत्र कोरडाच गेल्याने शेतकऱ्यांना पेरण्या करता आल्या नाही. पेरणी योग्य पाऊस न आल्याने गेल्या चार वर्षाच्या तुलनेत यावर्षी पेरणीला उशीर झाला आहे. त्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त आहेत. त्यामुळे आता "ये रे ये रे पावसा तुला देतो पैसा" अशी पावसालाही आमिष दाखविण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे.


धोंडी धोंडी पाणी दे..!




## सत्तेसाठी कुरघोडी, बळीराजा देशोधडी...

# बा विठ्ठला, कोणता झेंडा घेऊ हाती..!



## * जाती आरक्षणाच्या झेंड्याखाली बळीराजा दुर्लक्षीत

## शेतकरी दुष्काळाच्या खाईत, तर राजकीय पुढारी सत्तेच्या घाईत



●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

कधी कोरड्या दुष्काळाने उन्हाळयात कधी गारपिटीने तर कधी ओल्या दुष्काळाने शेतकऱ्यांना झोडपले असतांना राजकीय पुढारी मात्र बंडाळी करून सत्तेच्या घाईत आहेत. पोकळ आश्वासन देवून शेतकऱ्यांना गांजर देवून सत्ता उपभोगणाऱ्या आमदार मंत्र्यांनी बंडाळी करून राजकीय वातावरणात सत्तेसाठी कुरघोडी करत वेगळी उडी मारली आहे. स्वार्थाच्या राजकारणात बळीराजाचा कैवारी म्हणणाऱ्या पुढाऱ्यांनीच बळीराजांना वाऱ्यावर सोडले आहेत. त्यामुळे आता हे अश्रू पुसण्यासाठी विठ्ठला कोणता झेंडा घेऊ हाती अशी आर्तहाक बळीराजा करीत आहे. जाती आरक्षणाच्या झेंड्याखाली बळीराजाची परवड होत आहे. जाती वादाच्या नावाखाली शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष केल्या जात आहे.

पाणी हे जिवन आहे. असे म्हटले जाते दरवर्षी पिण्यासाठी पाणी मिळावे यासाठी नागरी वस्तीतून आणि सिंचनासाठी पाणी मिळावे यासाठी ग्रामीण भागातून करुणार्त हाकांनी दयाघण आभाळाची प्रार्थना जन मानसातुन होत असते. बोगस बियाण्यातून फसवणूक झाली मदतही नाही न्यायही मिळाला नाही. न्यायालयीन प्रक्रियेच्या नावाखाली कृषी अधिकाऱ्यांनी प्रकरण रफातफा केले. गारपीट ग्रस्तांना अद्यापही मदत मिळाली नसून खरडून गेलेल्या जमिनीचाही मोबदला शेतकऱ्यांना मिळाला नाही. निवडणुकीच्या तोंडावर दुष्काळाचे राजकारण करण्यासाठी व आपली राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी पुढारी बळीराजाच्या मदतीचा आव आणत आहेत. जिल्ह्यात गेल्या वर्षी भरलेल्या पीक विम्याची रक्कमही बळीराजाला अद्यापही मिळाली नाही. पीक कर्जही मिळाले नाही. कर्जमाफीही फसवी ठरली. शेतमालाल भाव नाही. निवडणुकीचे वारे वाहू लागले आहे. त्यामुळे जातीय आरक्षणाच्या मागणीचे झेंडे घेवून निवडणुकीत आपली राजकीय पोळी भाजण्याच्या तयारीत पुढारी आहेत. मात्र या आरक्षणाच्या झेंड्याखाली शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष केल्या जात आहे.

शासनाच्या शेकडो योजना अद्यापपर्यंत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचल्याच नाही अधिकारीही ह्या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवत नाहीत. निवडणुकीपुर्वी विविध धार्मिक मोर्चे काढून राजकीय वातावरण निर्मिती केल्या जाते. महाराष्ट्रासह जिल्ह्यात शेतकऱ्यांना कोणत्याच योजनेचा लाभ प्रत्यक्ष मिळाला नाही. शेतमालाला भाव नसल्यामुळे शेतकरी आत्महत्येचा मार्ग पत्कारत आहेत. या धर्तीवर शेतकऱ्यांसमोर कोणता झेंडा हातात घेवू असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर पडला आहे. राष्ट्रीयकृत बँकेने पीक कर्ज नाकारले. निवडणुकीच्या तोंडावर शेतकऱ्यांना मदतीचा पुळका आणणारे राजकीय पुढारी निवडणुकीच्या घाईत असल्याने शेतकऱ्यांवर दुर्लक्ष होत आहे.

परंतु त्यांनी यावेळी केवळ आश्वासनाची खैरात वाटण्याशिवाय इतर काहीही केले नाही. विशेष म्हणजे शेतकऱ्यांचे कैवारी म्हणून आपला झेंडा मिरविणाऱ्या मंत्री, खासदार, आमदाराने मात्र शेतकऱ्यांकडे सपशेल पाठ फिरविल्याचे दिसून येत आहे. जिल्ह्यात दुष्काळामुळे शेतमालाला भाव नसल्यामुळे शेतकरीवर्ग पुरता खचला आहे. त्याला आर्थिक मदत देणे गरजेचे आहे.

सुरुवातीला काही संघटना, पक्षांसह इतरांनी दुष्काळ जाहीर करावा असा नारा दिला आहे. परंतु पावसाबरोबरच हा नाराही आता परत फिरल्याने आपल्या पदरी मदत मिळावी यासाठी आता कोणता झेंडा घेऊ हाती अशी आर्तहाक शेतकरी विठ्ठलाकडे करताना दिसत आहे. लोकप्रतिनिधीसह शासनही नाकर्ते झाल्यामुळे आता खुद्द विठ्ठलानेच शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहावे, अशी भावनाही शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
सोमवार, दि. १५ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# निशुल्क योग शिबिराचे १५ ते २१ जूनपर्यंत आयोजन

**मेहकर :** बारावा आंतरराष्ट्रीय योग दिन २१ जून हा पूर्ण जगा मध्ये योग दिन म्हणून साजरा करण्यात येतो त्या अनुषंगाने १५ ते २१ जून २०२६ पर्यंत स्थानिक नगरपरिषद मेहकर व महिला पतंजली जिल्हा समिती व पतंजली योग समिती व माहेश्वरी महिला मंडळ राजस्थानी महिला मंडळ युनिक समर कॅम्प गायत्री परिवार सावित्रीबाई फुले योगासन प्रशिक्षण केंद्र व हजारी समर कॅम्प यांच्या संयुक्त उपक्रमाद्वारे आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून ७ दिवसीय योग शिबिराचे आयोजन स्थानिक महेश सेलिब्रेशन येथे १५ ते २१ जून २०२६ पर्यंत सकाळी ५:३० ते ७:०० या वेळामध्ये संपन्न होत असून या कार्यक्रमाची पूर्ण तयारी मोठ्या प्रमाणावर करण्यात आली आहे. योगाभ्यासाने आत्मबल वाढवून आपले निरोगी जीवन बनवण्याकरिता व विविध रोगावर मात करण्याकरिता मान्यवरांचे मार्गदर्शन व लहान मुले व स्त्रियांच्या आरोग्याचे मार्गदर्शन व योगासन प्राणायाम मुद्रा ॲक्युप्रेशरचे मार्गदर्शन व ह्या धावपळीच्या युगामध्ये ताण-तणावापासून कायमची मुक्ती मिळण्याकरता उपस्थित खासी बाहेरगाहून आलेल्या मान्यवरांचे मार्गदर्शनही लाभणार आहे.

# जळगाव जामोद तालुक्यात वादळ वाऱ्यासह पावसाची हजेरी

## अखेर मृग बरसला; वातावरणात गारवा



प्रतिनिधी १५ जून

**जळगाव जामोद:** गेल्या काही दिवसांपासून पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या जळगाव जामोद तालुक्यात रविवारी सायंकाळी अखेर मृग नक्षत्रातील पावसाने हजेरी लावली. सायंकाळी सहा वाजताच्या सुमारास उत्तरेकडून ढगांची गर्दी झाल्यानंतर अनेक भागांत वादळी वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली.

सातपुडा पर्वतरांगांच्या परिसरातील जामोद, सुनगाव, उसरा, खेर्डा, निंभोरा, जळगाव, चारबन, हनवतखेड, वडशिंगी, आसलगाव, बोराळा आदी गावांमध्ये पावसाच्या सरी बरसल्या. अचानक झालेल्या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. मान्सून लांबल्याने शेतकरी चिंतेत होते. कृषी विभागाच्या सूचनेनुसार बहुतांश शेतकऱ्यांनी अद्याप खरीप पेरणी सुरू केली नव्हती. मात्र, आता पावसाचे आगमन झाल्याने पेरणीपूर्व मशागतीच्या कामांना वेग येणार आहे.

**मान्सूनपूर्व कपाशी पिकाला मिळाला दिलासा**

विहीर, बोअरवेल व मोटार पंपाच्या साहाय्याने मान्सूनपूर्व कपाशीची लागवड केलेल्या शेतकऱ्यांना या पावसामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. उगवण झालेल्या कपाशीला आवश्यक ओलावा मिळाल्याने पिकांच्या वाढीस मदत होणार आहे.

**सातत्यपूर्ण पावसाची शेतकऱ्यांना प्रतीक्षा**

पहिल्या पावसाने दिलासा मिळाला असला तरी खरीप पेरणीला गती मिळण्यासाठी सातत्यपूर्ण पावसाची गरज आहे. पुढील काही दिवसांत चांगला पाऊस झाल्यास पेरणीची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू होतील, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत.

# नगरसेवकाच्या व्हायरल ऑडिओ प्रकरणी गुन्हा दाखल

## राजकीय व सामाजिक चर्चांना उधाण

प्रतिनिधी १५ जून

**मलकापुर :** मलकापुर शहरातील पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या वादाला आता नवे वळण मिळाले असूनं घ्श्घ्श् पक्षाचे नगरसेवक शेख इमरान शेख गुलाब याच्याविरुद्ध मलकापूर शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (ऍ्ए) कलम १९६(१) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांच्या माहितीनुसार, १३ जून रोजी सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका ऑडिओ क्लिपमध्ये करण्यात आलेल्या वक्तव्यामुळे दोन समाजांमध्ये तेढ निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. याबाबत पोलीस कर्मचारी मनोजकुमार उमाळे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. दरम्यान, मलकापूर शहरात तीव्र पाणीटंचाईचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. नागरिकांकडून नियमित पाणीपुरवठ्याच्या मागणीसाठी निवेदने, मोर्चे व आंदोलने करण्यात येत आहेत. अशा परिस्थितीत शहराच्या विस्तारित भागात नव्या पाईपलाईनचे काम सुरू असल्याने काही नागरिकांमध्ये नाराजी वाढली आहे.

याच पार्श्वभूमीवर विविध सामाजिक माध्यमांवर शहरातील पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावरून जनआंदोलनाचे आवाहन करण्यात आले होते. त्यानंतर संबंधित ऑडिओ क्लिप व्हायरल झाल्याने वातावरण अधिक तापले असून या प्रकरणाला जातीय रंग मिळू नये यासाठी पोलीस प्रशासन सतर्क झाले आहे. सध्या शहरातील परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत असून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येत असल्याची माहिती पोलीस विभागाने दिली आहे.

# विवरा येथील अवैध देशी दारू व वरली मटका बंद करण्यासाठी महिलांचा एल्गार

## पाच दिवसात गावातील अवैध धंदे बंद न केल्यास पोलीस स्टेशन समोर आमरण उपोषणाचा महिलांचा पोलीस निरीक्षकांना इशारा

प्रतिनिधी १५ जून



**मलकापुर:** तालुक्यातील विवरा गावामध्ये देशी दारू व वरली मटका राजरोसपणे सुरू असून अनेक वेळा लेखी व तोंडी स्वरूपात तक्रारी करून सुद्धा गावातील देशी दारू, वरली मटका बंद झाला नाही, देशी दारूमुळे अनेक संसार उधवस्त झाले आमच्या गावांमध्ये ७० टक्के तरुण दारूच्या व्यसनाधीन झाले त्यात काही तरुणांचा मृत्यू तर काहींच्या किडन्या, लिव्हर फेल झाला आहे काही तरुण दवाखान्यामध्ये उपचार घेत आहेत, गावातील वासुदेव तायडे व उषाबाई बोरले हे देशी दारूचा धंदा करतात त्यांच्याकडे गावातील प्रतिष्ठित समजावून सांगण्यासाठी गेले असता ते उद्धट भाषेत उत्तर देतात की आम्ही पोलिसांना हप्ते देतो... आमचं कोणीही काही वाटलं करू शकत नाही तरी त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी. देशी दारू व वरली मटका बंद करण्यात यावा आणि जो कोणी त्यांना देशी दारू गावात पोच करतो त्याची गाडी पेटवून त्याला सुद्धा आम्ही चोप देवू ,वेळ प्रसंगी कायदा हातात घेऊ तरी अवैध दारू येत्या पाच दिवसात बंद न झाल्यास आम्ही दसरखेड एम.आय.डी.सी पोलीस स्टेशन समोर दि.१९ जून २६ रोजी पासून आमरण उपोषण सुरू करू व जोपर्यंत गावातील दारू व वरली मटका बंद होत नाही तोपर्यंत आम्ही उपोषण सोडणार नाही असा पवित्रा महिलांनी घेतला असून या बाबतचे निवेदन एम.आय.डी.सी पोलीस निरीक्षक वारे यांना दि.१३ जुन २६ रोजी देण्यात आले आहे या निवेदनावर सविताबाई धांडे, बेबाबाई सांगळकर, यमुनाबाई वाडसे, सरलाबाई हिवाळे, रेखाबाई वाडसे,ललिताबाई सांगळकर, दिपाली खवले, राधाबाई सांगळकर सह महिलांच्या स्वाक्षऱ्या नमूद आहे.

# लोकशाही बळकट करण्यासाठी एसआयआर मोहिमेला सहकार्य करा : नीलेश शर्मा

प्रतिनिधी १५ जून

**बुलडाणा:** लोकशाही व्यवस्थेचा पाया असलेल्या मतदान प्रक्रियेत प्रत्येक पात्र नागरिकाचा सहभाग सुनिश्चित करण्यासाठी निवडणूक आयोगाने हाती घेतलेल्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा. मतदार यादीत आपले नाव, पत्ता व इतर तपशील अचूक असल्याची खात्री करून घ्यावी, असे आवाहन जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघ भाजपाचे बीएलए प्रमुख निलेश शर्मा यांनी केले आहे.

त्यांनी निवेदनात म्हंटले आहे की, मतदानाचा अधिकार हा प्रत्येक

मतदार नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे. तो प्रभावीपणे बजावण्यासाठी यादीतील नोंद अचूक असणे अत्यंत आवश्यक आहे. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत नवमतदारांची नोंदणी, मृत स्थलांतरित मतदारांची नावे वगळणे, तसेच, मतदारांच्या तपशीलामध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या करण्याचे काम सुरू आहे. अथवा युवा पिढीने या प्रक्रियेत विशेष सहभाग नोंदविण्याची गरज असल्याचे सांगताना त्यांनी १८ वर्षे पूर्ण झालेल्या सर्व पात्र युवक-युवतींनी तातडीने मतदार म्हणून नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले आहे.

मतदारांनी ज्या निवासस्थान बदलले आहे किंवा, नाव, पत्ता, जन्मतारीख यासारख्या तपशीलांमध्ये दुरुस्ती आवश्यक आहे, त्यांनी संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्याशी संपर्क साधून आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावेत, असेही त्यांनी म्हंटले आहे.

निवडणुकीच्या वेळी कोणत्याही अडचणींना सामोरे जावे लागू नये, यासाठी प्रत्येकाने आत्ताच मतदार यादी तपासून आवश्यक ती कार्यवाही करावी, असे त्यांनी नमूद केले.

जळगाव जा. विधानसभा मतदारसंघातील सर्व मतदारांनी आपल्या भागातील बीएलओ अथवा संबंधित निवडणूक नोंदणी कार्यालयाशी संपर्क साधून मतदार यादीतील नावाची पडताळणी करून घ्यावी. मतदार यादीत नाव असेल तरच, मतदानाचा हक्क बजावता येईल असे त्यांनी नमूद केले आहे.

# पैशांच्या वादातून दोन गटांमध्ये मारहाण

## परस्पर तक्रारींवरून ॲट्रॉसिटीसह गुन्हा दाखल

प्रतिनिधी १५ जून

**सिंदखेडराजा:** तालुक्यातील पांग्री उगले येथे मजुरीच्या पैशांच्या किरकोळ वादातून दोन गटांमध्ये परस्पर तक्रारी दाखल झाल्याने किनगाव राजा पोलीस ठाण्यात दोन्ही बाजूंविरुद्ध फौजदारी गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

या प्रकरणात अनिता कडूबा निकाळजे वय ४५, रा. पांग्री उगले, यांच्या तक्रारीनुसार १२ जून रोजी सायंकाळी मजुरीच्या पैशांच्या वादातून संबंधित गटाकडून जातिवाचक शिवीगाळ, मारहाण व जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. या तक्रारीवरून गजानन धनसिंग राठोड, जितेंद्र गजानन राठोड, जनाबाई गजानन राठोड व कोमल जितेंद्र राठोड यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांच्यावर भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ११८ (१), ११५(२), २९६,३५१(२), ३५२ तसेच अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ अंतर्गत ॲट्रॉसिटी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या गुन्ह्याचा तपास संबधित पोहेकॉ करीत असून पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी मनीषा कदम यांच्यामार्गदर्शनाखाली सुरू आहे. याच घटनेच्या अनुषंगाने दुसऱ्या गटाकडूनही परस्पर तक्रार दाखल करण्यात आली असून त्यावरून स्वतंत्र गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणात फिर्यादी जितेन्द्र गजानन राठोड (वय ३१, रा. पांग्री उगले, यांच्या तक्रारीवरून एकूण ९ आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तक्रारीनुसार १२ जून रोजी सायंकाळी १७००/- च्या जुन्या व्यवहारातून वाद निर्माण होऊन फिर्यादीच्या घरी गैरकायद्याचा जमाव करून शिवीगाळ, मारहाण व जीवे मारण्याची धमकी देण्यात आली.

या प्रकरणी भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १८९ (२), १९१(२), १९१(३), १९०, ११८(१), २९६, ११५(२), ३५१ (२), ३५२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यांचा व प्रकरणाचा तपास पोहेकॉ विश्वास काकड पुढील तपास करीत आहे.

# ७०० ब्रासपर्यंत माती उत्खननावर स्वामित्वधनातून सवलत

प्रतिनिधी १५ जून

**सिंदखेडराजा:** राज्यातील पारंपरिक कुंभार व्यवसायाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून पिढीजात कुंभार कुटुंबातील प्रत्येक कुटुंबातील एका पात्र व्यक्तीस माती उपलब्धता, उत्खनन परवानगी, स्वामित्वधन सवलत तसेच विविध प्रशासकीय सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विभागाने शासन निर्णय क्रमांक गौखनि १०/०५२६/प्र.क्र. १२४/ख-२ अन्वये १० जून २०२६ रोजी हा निर्णय जारी केला आहे. शासन निर्णयानुसार, तहसीलदारांकडून विशेष ओळखपत्र प्राप्त केलेल्या पिढीजात कुंभार कुटुंबातील पात्र व्यक्तीस वर्षाकाठी ७०० ब्रासपर्यंत माती उत्खननासाठी स्वामित्वधनातून सवलत देण्यात येणार आहे. मात्र जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी तसेच इतर लागू शुल्कांचा भरणा करणे बंधनकारक राहणार आहे. ७०० ब्रासपेक्षा अधिक उत्खनन झाल्यास नियमानुसार स्वामित्वधन, डीएमएफ इतर शुल्क आकारले जाणार आहेत.

महाराष्ट्र गौण खनिज (विकास व विनियमन) नियम, १९६८ अंतर्गत देण्यात आलेल्या या सवलतीमुळे पात्र लाभार्थ्यांना माती उपलब्ध करून घेण्याची प्रक्रिया अधिक सुलभ होणार आहे.

वापरण्यास तसेच गावतळी, पाझर तलाव, बंधारे, पाणलोट क्षेत्र तसेच जलसंधारण व जलसंपदा विभागाच्या प्रकल्पांमधील गाळ अथवा माती कुंभार व्यवसायासाठी परवानगी देण्यात आली आहे. संबंधित विभागांची ना-हरकत घेऊन हा गाळ अथवा माती स्वखर्चाने काढून नेल्यास ७०० ब्रास मर्यादेत स्वामित्वधनातून सवलत लागू राहणार आहे. मात्र अश्इ व इतर शुल्क लागू राहतील. पारंपरिक व्यवसाय करणाऱ्या पिढीजात कुंभार समाजातील कुटुंबातील एका पात्र व्यक्तीस तहसीलदारांकडून विशेष ओळखपत्र देण्यात येणार असून ते 'महाखनिज' प्रणालीद्वारे ऑनलाइन अर्ज करून प्राप्त करता येणार आहे. हे ओळखपत्र पाच वर्षांसाठी वैध राहणार असून त्याचे नूतनीकरण करता येणार आहे. ओळखपत्रधारकांनाच सवलतींचा लाभ मिळणार आहे. या माती उत्खनन व वाहतुकीसाठीची परवानगी प्रक्रिया 'महाखनिज' प्रणालीद्वारे राबविण्यात येणार असून ७०० ब्रासपर्यंतच्या परवानगीसाठी ई-वाहतूक परवाना विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. कोणत्याही प्रकारची वाहतूक पासशिवाय मातीची वाहतूक केल्यास महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

# खांडवी येथे राष्ट्रवादी कॉँग्रेस (श.प.) पक्षाच्यावतीने रास्तारोको

प्रतिनिधी १५ जून

**जळगाव जामोद :** कर्जमाफी संदर्भात जीआरमध्ये जाचक अटी लावून शेतकऱ्याची फसवनुक करनाऱ्या सरकारचा निषेध करण्यासाठी १४ जून रोजी तालुक्यातील खांडवी येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रसेनजीत पाटिल यांच्या नेतृत्वात जळगाव जामोद तालुक्यातील खांडवी येथे नांदुरा जळगाव जामोद मार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

राष्ट्रवादी कॉग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे युवा नेतृत्व रोहित पवार यांचे शेतकरी कर्जमाफीतील जाचक अटी विरोधात पंढरपुर येथे १२ जून पासून बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरु झाले आहे. सरकारने जाहिर केलेल्या कर्जमाफीच्या जीआरमध्ये सन २०१९ मध्ये कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्याना वगळण्यात आले आहे. यामुळे लाखों शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहणार आहेत. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी देवेंद्र फडणवीस शेतकऱ्याचा सातबारा कोरा-कोरा करुन संपूर्ण कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. परंतु आता काढलेल्या कर्जमाफीच्या जीआरमध्ये हे भाजपा सरकार शेतकऱ्याची फसवणूक करीत असल्याचे उघड़ झाले आहे. जीआर जाचक अटी रद्द करण्यासाठी आमदार रोहित पवार यांनी सुरु केलेल्या अन्नत्याग आंदोलनाला पाठिंबा म्हणून तसेच शेतकऱ्याची फसवणूक करनाऱ्या सरकारचा निषेध करण्यासाठी १४ जून रोजी राष्ट्रवादी कॉँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रसेनजीत पाटिल यांच्या नेतृत्वात खांडवी येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी विधानसभा अध्यक्ष विश्वासराव पाटिल, तालुकाध्यक्ष प्रमोद सपकाळ, करीम खान, महादेव भालतडक, आशिष वायझोडे, दत्ता डिवरे, सिद्धार्थ हेलोड़े, सुभाष कोकाटे, विठ्ठल वाघ, अंबादास सारोकार, पंजाब वाघ, राम पारस्कार, संतोष जवरे, सलीम खान, रत्नाकर मानकर, गजानन चतारे, भिका वानखड़े, अरुण बावस्कार, जय कागदे, डिगांबर तिजारे, सुनिल तायडे, मिर्जा खान, अविनाश गावंडे, सुहास वाघ, पवन वाघ, विठ्ठल अवचार, कैलास मानकर, योगेश भीसे, विशाल वाघ, प्रकाश पारस्कार, गजानन चंभारे, विनोद खूपसे, प्रमोद गई यांच्यासह शेकडो शेतकरी बांधव व पदाधिकारी उपस्थित होते.

# तब्बल ३५ तासापासून वीज गायब

## साखरखेर्डा परिसरातील जनजीवन विस्कळीत

प्रतिनिधी १५ जून

**साखरखेर्डा:** साखरखेर्डा वीज वितरण कंपनी अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये महावितरणच्या कथित गलथान कारभारामुळे तब्बल ३५ तासाहून अधिक विजेपुरवठा खंडित राहिल्यामुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले होते.

१२ जून रोजी सकाळी दहा वाजेपासून खंडित झालेला विजयपुरवठा १३ जून रोजी सायंकाळी सव्वा सात वाजेपर्यंत सुरळीत झालेला नव्हता त्यामुळे नागरिकांचा वीज समस्यांचा सामना करावा लागला खंडित झाल्यामुळे गावातील पाणी पुरवठा ठप्प झाली.

परिणामी अनेक गावातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागली दुसरीकडे शेतकऱ्यांना जनावरांना पाणी उपलब्ध करून देण्यात मोठ्या अडचणी निर्माण झाल्या उष्णतेच्या वातावरणात गुरांच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला होता. मोबाईल चार्जिंग घरगुती उपकरणे लघुउद्योग तसेच विज गायब पाणी बंद साखरखेर्डा परिसरातील जनजीवन ठप्प महावितरण चा हलगर्जीपणा पस्तीस तास वीज नसल्याने नागरिक हैराण गुरांच्या पाण्यापासून मोबाईल चार्जिंग पर्यंत सर्व विस्कळीत साखरखेर्डात वीज संकट पस्तीस तासाचा ब्लॅक आउट साखरखेर्डा परिसरातील गावांनी शोषला हालअपेष्टा व्यावसायिक व्यवहारावरही विपरीत परिणाम झाला होता विद्यार्थ्यांच्या अभ्यासात सुद्धा खोडा निर्माण झाला आहे नागरिकांना अंधारात वेळ काढावा लागला वारंवार बंद होणाऱ्या या विजेच्या लपंडावामुळे नागरिक मात्र हैराण झाले असून साखरखेर्डा परिसरातील नागरिकांनी महावितरणने वीजपुरवठ्याबाबत

कायमस्वरूपी उपाययोजना कराव्या तसेच अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी आणि भविष्यात अशा प्रकारच्या दीर्घकालीन खंडितीची पुनरावृत्ती होऊ नये अशी मागणी केली आहे.

# जन्मभूमी ते कर्मभूमी शिव विचारांचा जागर..

## सिंदखेड राजा ते पाचड जिजाऊ अभिवादन यात्रा आजपासून

प्रतिनिधी १५ जून

**बुलढाणा :** स्वराज्य जननी माँ साहेब जिजाऊ यांच्या पदस्पर्शाने पुनित झालेल्या जन्मभूमी सिंदखेड राजा ते कर्मभूमी पाचाड (रायगड) अभिवादन यात्रा सोमवार १५ जूनपासून सुरू होत आहे. सिंदखेडराजा येथे सकाळी जिजाऊंच्या विधिवत पूजनाने या अभिवादन यात्रेला जिजाऊंचे वंशज शिवाजी राजे जाधव व जाधव परिवाराच्या वतीने हिरवी दिंडी दाखवली जाईल.


अनेक जिल्ह्यातून ही यात्रा जात असून ठिकठिकाणी अभिवादन यात्रेचे उत्स्फूर्त स्वागत करून नामवंत सहभागी होणार आहे. राजे लखोजीराव जाधव, जिजाऊ माँ साहेब व छत्रपती शिवरायांच्या विचाराचा जागर घालण्यासाठी ही यात्रा जिजाऊ अभिवादन समिती, महाराष्ट्र राज्य, राजे लखुजीराव जाधवराव ट्रस्ट पुणे, छत्रपती शंभुराजे ट्रस्ट किल्ले रायगड, नवयुग विद्यापीठ ट्रस्ट महाड, समस्त गावकरी मंडळी पाचाड (रायगड) द्वारा शिवाजीराजे यांच्या नेतृत्वात यात्रा सुरू करण्यात आली आहे. नाव्हा - मार्गे जालना येथे सतीश सुरेशराव देशमुख यांच्या कडे स्वागत व अल्पोपहार करून बदनापूर-करमाड-मार्गे छत्रपती संभाजी नगर येथे दिलीपराव बनकर स्वागत करतील. नेवासा घोडेगाव मार्गे अहिल्यानगर येथे द्वारकाधीश राजेभोसले यांच्या वतीने स्वागत व भोजन व्यवस्था राहणार आहे. सुप्पा येथे ग्रिन हेवन मंगल कार्यालय येथे सुरेश थोरात, दिपक पवार, योगेश रोकडे यांच्या कडे मुक्काम राहील. राजे साबुसिंग पवार यांच्या समाधिचे निलेश लंके खासदार यांच्या हस्ते पुजन करून यात्रा पुढे रवाना होईल. १६ जून रोजी सकाळी सुपे -शिरूर - रांजणगाव येथून शिक्रापूर येथे विशाल पाबळे व मित्रमंडळातर्फे आयोजित कार्यक्रमास उपस्थित राहून लोणीकंद मार्गे वढु बुद्रुक छत्रपती संभाजी महाराजांच्या समाधीचे दर्शन घेवून वाघोली येथील स्व. पिलाजीराव जाधवराव यांच्या समाधी स्थळाला अभिवादन करणार आहे. संग्रामसिंह नरसिंगराव जाधवराव यांच्याकडे भोजन करून लालमहाल येथे जिजाऊंना अभिवादनानंतर निजामपुर मार्गे महाड येथे ॲड. रंजीतसिंह विजयसिंह जाधवराव यांच्यावतीने लाडवली येथील नवयुग विद्यापिठात भोजन व मुक्काम आहे. १७ जून रोजी सकाळी १० वाजता पाचाड येथील जिजाऊ माँ साहेबांच्या समाधीचे सिंदखेडराजा येथील लखुजीराव राजे यांच्या राजवाड्यातील पवित्र जलाने अभिषेक सौ. सिमा महेश बेढुंगडे सरपंच, पाचाड व मान्यवरांच्या हस्ते करण्यात येईल. त्यानंतर पाचाड ग्रामपंचायत भवन येथे पद्मश्री डॉ. हिंमतराव बावस्कर यांचा विशेष सत्कार व मेहकरचे आ. सिध्दार्थ खरात, समीर जाधवराव, पुणे यांच्या हस्ते होणार आहे. तरी सर्व जिजाऊ भक्तांनी या अभिवादन यात्रेमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन शिवाजीराजे जाधव यांनी केले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
सोमवार, दि. १५ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# अधिक मास समाप्ती आणि सोमवती अमावस्येच्या पर्वावर वांगेश्वरला भक्तांची अलोट गर्दी

प्रतिनिधी १५ जून

**♦ मंगळवारपासून शुभ कार्यांना होईल सुरुवात**



**अकोला :** पवित्र पुरुषोत्तम महिन्याची समाप्ती आणि सोमवती अमावस्येच्या पावन पर्वावर अकोट शेगाव रोडवर येणाऱ्या वांगेश्वर संस्थांनच्या त्रिवेणी संगमावर पुरुषोत्तम मास ची समाप्ती व सोमवती अमावस्येच्या पहाटे अंघोळी करता लोकांनी प्रचंड गर्दी केली होती. वांगेश्वर संस्थान हे त्रिवेणी संगम म्हणून ओळखले जाते. या संगमावर स्नान केल्याने सर्व विघ्न दूर होतात अशी धारणा असल्यामुळे हजारो लोकांनी वांगेश्वर महादेव दर्शनाकरिता व त्रिवेणी संगमावर स्नानाकरिता प्रचंड गर्दी केली होती. त्यामुळे त्रिवेणी संगमाकाठी सर्वत्र भक्तांची आणि वाहनांची गर्दी दिसून आली. अकोला शहर आणि जिल्ह्यात महिनाभर चाललेला अधिक मास रविवारी श्राद्ध अमावस्या सोबत संपला. काहींच्या मते सोमवती अमावस्या सोमवारी असल्याने मंगळवारपासून शुभ कार्यक्रमांना सुरुवात होऊ शकते. यामुळे आता विवाह सोहळे आणि इतर शुभ प्रसंगासाठी मार्ग मोकळा झाला आहे. गेल्या महिनाभरात धार्मिक कार्यक्रमांची मालिका सुरू होती. आणि कोणतेही शुभ कार्यक्रम होत नव्हते. परंतु आता अधिकमास संपल्याने लवकरच सर्व शुभ ठिकाणी शहनाई चा आवाज घुमणार आहे. अधिक मास संपल्यानंतर येणाऱ्या शुभ मुहूर्तांचा विचार करून अनेक लोकांनी त्यांच्या लग्नाच्या तारखा आधीच निश्चित केल्या आहेत. आणि योग्य योजना आखल्या आहेत. लग्नासाठी शुभ मुहूर्त १७ जून पासून सुरू होईल या व्यतिरिक्त बँड पथक आणि कॅटरर्सलाही रोजगाराच्या संधी मिळतील. पुरुषोत्तम महिला संपल्याने विवाह, गृहप्रवेश, मुंडन, नामकरण, आणि इतर शुभ कार्यक्रमावरील स्थगिती आता उठली आहे. अधिक मासात धार्मिक दृष्टिकोनातून विवाह आणि इतर बहुतेक शुभ कार्यक्रम केले जात नाहीत. विवाह आणि इतर मोठे कार्यक्रम अनेकांना रोजगार देतात. परंतु गेल्या महिन्याभरापासून हे व्यवसाय बंद असल्याने व आता शुभ कार्यक्रम पुन्हा सुरू झाल्याने या व्यवसायांना पुन्हा चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# शहरात सुटे तेल मिळणे झाले बंद

प्रतिनिधी १५ जून

**♦ शहरातील खुले तेल माफियांवर अंकुश**



**अकोला :** अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्त पदाचा पदभार स्वीकारतात त्यांनी अन्नपदार्थात भेसळ करणाऱ्यांचा समाचार घेण्यास सुरुवात केली आहे. अन्न व औषधी विभागाच्या कारवायांमुळे दूध माफिया गुटखा माफिया सोबतच आता खुले तेल माफीया सुद्धा रडारवर आल्याने शहरात तसे ग्रामीण परिसरात खुले तेल मिळणे बंद झाले आहे काही दिवसांपासून अचानक शहरातील अनेक किराणा दुकानदारांनी तसेच तेल घाना वाल्यांनी सुटे खाद्यतेल विक्री बंद केली आहे गेल्या कित्येक वर्षांपासून सुरू असलेली सुट्या तेलाची विक्री कशी काय बंद झाली हा प्रश्न ग्राहकांना निर्माण झाला आहे दुकानदार थेट एक लिटर पाच लिटर दहा लिटर तेल डबा ग्राहकांना देत आहेत अचानक तेलाच्या किमती वाढल्या तसेच तेलाची चवही बदलली त्यामुळे दुकानदाराने जास्त नफा साठी आतापर्यंत काय खाऊ घातले हा प्रश्न समोर येत आहे अकोला शहरातील तेल घाने आणि एमआयडीसी परिसरातील ऑइल मिल मधून येणाऱ्या अनेक खाजगी कंपन्यांचे सुटे तेल बंद झाले आहे त्यामुळे अनेक तर्कवितर्क लढवले जात आहेत काही असो पण तुकाराम मुंडे आल्यानंतर चांगले तेल गरिबांच्या ताटात आले आहे सुट्या तेलाचा जास्त वापर हॉटेल लग्न किंवा समारंभातील जेवण फास्ट फूड इत्यादीसाठी केला जायचा या तेलामुळे हृदयविकार त्वचा विकार अपचन आधी विकारांचा सामना नागरिकांना करावा लागत असे आता सुटे तेल बंद झाल्याने ग्राहक मात्र इतके दिवस आपण काय खाल्ले या गोष्टीने विक्रेत्यांना लाखोली वाहत आहेत

**मुंढे मुळे शुद्ध तेल गरिबांच्या ताटात**

♦ शहरातील अनेक खासगी कंपन्यांचे सुटे तेल बंद झाले आहे त्यामुळे हॉटेल व्यवसाय लग्न किंवा अन्य समारंभातील जेवण फास्टफूड विक्रेते यावर परिणाम होईल या सर्वांना सुद्धा आता पॅकिंगचे तेल वापरणे भाग पडणार आहे तर दुसरीकडे शुद्ध तेल मिळण्याची खात्री झाल्याने आता हृदयविकार रक्ताची घनता वाढ ते मृत्यू त्वचा विकार अपचन आदी रोगांची रोकथाम होण्यास सुद्धा मदत होऊ शकेल त्यामुळे काहीही असो अन्न व औषध प्रशासनाचा कारभार तुकाराम मुंडे सारख्या अधिकाऱ्याकडे आल्याने चांगले आणि शुद्ध तेल गरिबांच्या ताटात आले आहे.

# महावितरणचा ग्राहकांना 48 तासांचा 'अल्टीमेटम'

प्रतिनिधी १५ जून

**♦ मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनाचे काय?**




**अडगांव बु.:** एका बाजूला वीज ग्राहकांकडून महावितरणच्या ढिसाळ सेवेबद्दल सातत्याने बोंबाबोब सुरू असताना, आता महावितरणने ग्राहकांना थेट 'अल्टीमेटम' देण्यास सुरुवात केली आहे. 'पुढील ४८ तासांत तुमचे जुने मीटर बदलून त्या जागी 'स्मार्ट मीटर' बसवले जाईल,' असा थेट मेसेज महावितरणकडून ग्राहकांच्या व्हॉट्सपवर पाठवला जात आहे. यामुळे ग्राहकांमध्ये तीव्र संताप आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. गावात अनेक ग्राहकांचे मिटर सुव्यवस्थीत असतांना नाहक हे स्मार्ट मिटर लादण्याची सक्ती कशासाठी याबाबत काही महिन्यांपूर्वी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत स्पष्ट आश्वासन दिले होते की, 'राज्यात कुठेही बळजबरीने महावितरणकडून स्मार्ट मीटर बसवले जाणार नाहीत.' मात्र, मुख्यमंत्र्यांच्या या आश्वासनानंतरही महावितरणने ग्राहकांना थेट पूर्वसूचना देणारे मेसेज धाडल्यामुळे 'मुख्यमंत्र्यांच्या त्या आश्वासनाचं नक्की काय झालं?' असा सवाल आता नागरिक उपस्थित करत आहेत. आधीच वाढीव बिलांमुळे त्रस्त असलेल्या सामान्य जनतेला आता या ४८ तासांच्या अल्टिमेटममुळे मनस्ताप सहन करावा लागत असून, महावितरणच्या या 'स्मार्ट' सक्तीविरोधात ग्राहकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

# जंगलात आरोपी चप्पल टाकून झाला पसार

प्रतिनिधी १५ जून

**♦ मोझरी खुर्दच्या वनक्षेत्रात आरोपीचा शोध**



**अकोला :** बार्शीटाकळी तालुक्यातील पिंजर पोलीस स्टेशन हद्दीत घडलेल्या अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणामुळे संपूर्ण परिसर हादरला असून या गंभीर गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलीस यंत्रणा गेल्या तीन दिवसांपासून प्रयत्न करत आहे. अत्याचार आणि पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी फरार झाल्याचा चर्चा सद्या सुरू असून त्याला अटक करण्यासाठी पोलिसांनी जंगल, डोंगरकपारी आणि दुर्गम भाग पिंजून काढण्यास सुरुवात केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी मोझरी खुर्द येथील वनक्षेत्रात लपून बसल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी मोठी शोधमोहीम राबविली. जंगलातील प्रत्येक भागाची तपासणी करण्यात आली. डॉग स्कॉडची मदत घेण्यात आली. संशयिताच्या हालचालींचा माग काढण्यासाठी स्थानिक सूत्रे, गुप्त माहितीदार आणि तांत्रिक साधनांचाही वापर करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. शोध मोहीमेदरम्यान आरोपी काही वेळासाठी पोलीस पथकाच्या नजरेस पडल्याचे सांगितले जात आहे. आरोपीचा पाठलाग सुरू होताच त्याने जंगलातील झुडपे, नाले आणि डोंगर उतारांचा फायदा घेत पोलिसांना चकवा दिल्याची चर्चा सद्या सुरू आहे. या धावपळीत आरोपीची चप्पल घटनास्थळी पोलिसांना मिळाल्याची माहिती मिळाली आहे. या कारवाईत पिंजर पोलीस स्टेशनचे ठाणेदार गजानन राठोड, माजी ठाणेदार गंगाधर दराडे, बीट जमादार चव्हाण यांच्यासह पोलीस कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. आरोपीला पकडण्यासाठी वेगवेगळ्या दिशांनी सापळे लावण्यात आले आहेत. दरम्यान, अल्पवयीन मुलीवरील अत्याचाराचे प्रकरण असल्यामुळे या गुन्ह्याचे गांभीर्य अधिक वाढले आहे.

# गोरक्षण रोडवरील अतिक्रमण काढले



प्रतिनिधी १५ जून

**अकोला :** महापालिकेच्या वतीने शहरातील विविध भागात केलेले अस्थायी अतिक्रमण काढले जात आहे. त्या अनुषंगाने आज सकाळी गोरक्षण रोडवरील अतिक्रमण काढले. काही दिवसांपासून अतिक्रमण हटाव मोहीम राबवली जात आहे.

बल्ल्या, टीन, तट्टे यांचा वापर करून दुकाने थाटली होती. त्या विरुद्ध कारवाई करण्यात आली. रस्त्यावर दोन्ही बाजूला अतिक्रमण झाल्यामुळे रहदारीला अडथळा निर्माण झाला होता. ही अडचण दूर व्हावी म्हणून महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने कारवाई केली. विशेष म्हणजे एकदा काढलेले अतिक्रमण पुन्हा त्या ठिकाणी होणार नाही या बाबतीत दक्षता घ्यावी लागेल. कारण विविध भागात पुन्हा पुन्हा अतिक्रमण झालेले दिसते. हे दुष्टचक्र थांबणे गरजेचे आहे.

# 10 कर्मचाऱ्यांचा 'लाल परी गौरव रत्न पुरस्कार' देवून सन्मान

प्रतिनिधी १५ जून

**बुलढाणा :** रा.प. विभागीय कार्यालय, बुलढाणा येथील लिपीक सचिन पिंगळे यांच्यासह जिल्ह्यातील १० कर्मचाऱ्यांचा प्रादेशिक कार्यालय, अमरावती येथे प्रादेशिक व्यवस्थापक रोहन पलंगे, कार्यशाळा अभियंता राहुल मोडक यांच्या हस्ते' लालपरी गौरव रत्न पुरस्कार' देवून सत्कार करण्यात आला. एसटी. महामंडळाचे अध्यक्ष तथा परिवहन मंत्री प्रतापजी सरनाईक तथा उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक माधव कुसेकर यांच्या संकल्पनेतून यावर्षीपासून एसटी. महामंडळाचे हिताची काम करत असताना त्यांना एसटीचे अपेक्षित उत्पन्नापेक्षा जास्त उत्पन्नआणणारे, प्रवासा दरम्यान सापडलेल्या वस्तू, दागिणे, पैसे महत्त्वाची कागदपत्रे प्रवाशांना परत करीत एसटी. महामंडळाची प्रतिमा उंचवण्याची, वाढवण्याची जनमानसात काम केली. अशा चालक, वाहक, लिपीक तथा कर्मचाऱ्यांना 'लाल परी गौरव रत्न पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात येईल, असे जाहीर केले होते. मागवलेले शिफारस अर्जानुसार बुलढाणा विभागातील १० कर्मचाऱ्यांचा त्यात समावेश आहे. यामध्ये संपूर्ण महाराष्ट्रातून लिपिक प्रवर्गातून एकमेव सचिन लक्ष्मण पिंगळे, रा.प. विभागीय कार्यालय, बुलढाणा तसेच चिखली आगारातील वाहतूक नियंत्रक संजय श्रीराम लांडे तसेच चालक गणेश भि. देवरे, मेहकर आगारातील वाहक राजू प्रल्हाद चव्हाण, चालक सुधीर अशोक शिंगोटे, मलकापूर आगारातील चालक सुनील बोर्डे व ए. एम. अहमद, जळगाव जामोद आगार चालक-वाहक आ. यु. खान, बुलढाणा विभागातील बुलढाणा आगाराच्या वाहक सौ. वैशाली पी. शिरसागर यांचा प्रादेशिक कार्यालय, अमरावती येथे प्रादेशिक व्यवस्थापक रोहन पलंगे, कार्यशाळा अभियंता राहुल मोडक यांच्या हस्ते 'लाल परी गौरवरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

# जागतिक बँक पुरस्कृत महाराष्ट्र शहरी पाणीपुरवठा, स्वच्छता व पुनर्वापर कार्यक्रम

**♦ अकोला शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेचा समावेश करण्यात यावा**
**♦ आमदार रणधीर सावरकर यांची मागणी**

प्रतिनिधी १५ जून



**अकोला :** अकोला महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांच्या भविष्यातील वाढत्या पाण्याची गरज लक्षात घेता, अकोला शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेचा समावेश जागतिक बँक पुरस्कृत 'महाराष्ट्र शहरी पाणीपुरवठा, स्वच्छता व पुनर्वापर कार्यक्रम' (श्ळेंइं) अंतर्गत करण्यात यावा, अशी मागणी भाजप विधिमंडळ पक्षाचे मुख्य प्रतोद तथा आमदार रणधीर सावरकर यांनी शासनाकडे केली आहे. या योजनेमुळे अकोलेकरांना सुरळीत पाणीपुरवठा मिळून मोठा दिलासा लाभणार आहे.

आमदार सावरकर यांनी सांगितले की, शहरात सध्या 'अमृत २.०' अभियानांतर्गत पाणीपुरवठा योजनेचे काम सुरू आहे. मात्र, या योजनेचा पूर्ण क्षमतेने उपयोग होण्यासाठी आणि भविष्यातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता वाढीव पाणीपुरवठा योजना राबवणे अत्यंत आवश्यक आहे. 'श्ळेंइं' या जागतिक बँकेच्या महत्त्वकांक्षी कार्यक्रमांतर्गत या योजनेला मंजुरी मिळाल्यास शहराची पाणीपुरवठा यंत्रणा अधिक सक्षम आणि दर्जेदार करता येईल. पाणीटंचाईवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी अकोला शहरातील पाणीपुरवठा यंत्रणा अधिक सक्षम, सुरळीत करणे हा या मागणीचा मुख्य उद्देश आहे. जागतिक बँकेच्या सहकार्याने चालणाऱ्या या प्रकल्पामुळे केवळ शुद्ध पाणीपुरवठाच नाही, तर पाण्याचा पुनर्वापर आणि सांडपाणी व्यवस्थापनालाही बळ मिळणार आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी आमदार रणधीर सावरकर यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा लावून धरला आहे. यासाठी महापौर सौ. शारदा रणजित खेडकर तसेच सभापती (स्थायी समिती) विजय अग्रवाल यांनी सुध्दा आयुक्त महोदयांशी चर्चा करुन पत्रव्यवहार केला आहे. तसेच आमदार रणधीर सावरकर यांच्या सहकार्याने जागतिक बँक पुरस्कृत 'महाराष्ट्र शहरी पाणीपुरवठा, स्वच्छता व पुनर्वापर कार्यक्रम' (श्ळेंइं) अंतर्गत समावेश व्हावा म्हणून सातत्याने पाठपुरावा करीत आहे.

# लघु प्रकल्पातील जलसाठा 40 टक्क्यांच्या आत!

**♦ शेतकऱ्यांची चिंता वाढली; वरूड, मोर्शी तालुक्यातील वास्तव**

प्रतिनिधी १५ जून



**वरूड :** यदाच्या पावसाळ्याच्या मोर्शी व वरूड तालुक्यातील बहुतांश लघु सिंचन प्रकल्पांमध्ये पाणीसाठा मर्यादित असल्याचे चित्र समोर आले आहे. जून रोजीच्या ८ अहवालानुसार अनेक जलाशयांमध्ये केवळ २५ ते ३८ टक्क्यांपर्यंतच पाणी उपलब्ध असून आगामी काळात पावसाने ओढ दिल्यास पिण्याच्या व सिंचनाच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

अहवालानुसार २५१ ते ६०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या प्रकल्पांमध्ये वायगाव लघू प्रकल्पात ३८.२६ टक्के, सातनूरमध्ये ३६.४४ टक्के, बहादा मध्ये ३५.०९ टक्के तर पुसली प्रकल्पात ३४.७७ टक्के पाणीसाठा नोंदविण्यात आला आहे.याशिवाय त्रिवेणी प्रकल्पात ३१.३६ टक्के पाणी उपलब्ध आहे. १०१ ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेच्या प्रकल्पांमध्येही समाधानकारक स्थिती नसून नागठाणा प्रकल्पात ३३.२७ टक्के, पंढरीत ३०.७३ टक्के, जमालपूरमध्ये ३०.१९ टक्के, जामगावमध्ये २९.८५ टक्के, पूर्णसना येथे २९.३० टक्के तर लिंगा प्रकल्पात केवळ २५.०६ टक्के पाणीसाठा आहे. मोर्शी तालुक्यातील शाहापूर लघू प्रकल्पात २७.४० टक्के पाणीसाठा शिल्लक असून परिस्थितीवर प्रशासनाचे लक्ष आहे. सध्या बहुतांश भागात पावसाची प्रतीक्षा कायम असल्याने शेतकरी वर्ग चिंतेत आहे. विशेषतः संत्रा उत्पादक पट्ट्यात पाण्याची उपलब्धता महत्त्वाची असल्याने येत्या काही दिवसांत चांगला पाऊस होणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त होत आहे.

**विहिरींची पाण्याची पातळी खालावली**

तालुक्यात अद्याप समाधानकारक पाऊस न झाल्याने भूजल पातळीत घट झाली असून अनेक भागातील विहिरींची पाण्याची पातळी खोलवर गेली आहे. त्यामुळे शेतकरी व ग्रामीण भागातील नागरिकांना पाण्याच्या टंचाईचा सामना करावा लागत आहे. संत्रा उत्पादक पट्ट्यातही सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता कमी होत असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. येत्या काही दिवसांत चांगला पाऊस न झाल्यास परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**जलाशयातील पाणीसाठा**

- ♦ वायगाव लघू प्रकल्प - ३८.२६टक्के
- ♦ सातनूर लघु प्रकल्प - ३६.४४ टक्के
- ♦ बहादा लघु प्रकल्प - ३५.०९ टक्के
- ♦ लिंगा लघु प्रकल्प - २५.०६ टक्के
- ♦ शाहादापूर लघु प्रकल्प - २७.४० टक्के

# जि. प. सिंचन विभागाची कोटींची देयके रखडली!

प्रतिनिधी १५ जून

**♦ तीन महिन्यांपासून 'तारीख पे तारीख' ने कंत्राटदार त्रस्त**

**यवतमाळ :** जिल्हा परिषद सिंचन विभागाकडून मोठ्या प्रमाणात झालेल्या नाला खोलीकरण व सिमेंट नाला बांधकामांचे कोटींचे देयके रखडले असून गेल्या तीन महिन्यापासून कंत्राटदारांना तारीख पे तारीख दिल्या जात आहे. विशेष म्हणजे कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या अंतर्गत वादामुळे देयके वेळेत वित्त विभागात पाठविण्यात आलीच नाहीत, त्याचा फटका मात्र कंत्राटदारांना सोसावा लागत आहे.

जिल्हा परिषदेच्या सिंचन विभागाकडून सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात जिल्ह्यात शेकडो कोटींचे जलसंधारणाचे कामे करण्यात आली, यामध्ये प्रामुख्याने नाला खोलीकरण, नवीन सिमेंट बंधारा बांधकाम असे कामे करण्यात आली. यातील बहुतांश कामे मार्च पूर्वी पूर्ण झाली. परंतु अभियंत्यांच्या हलगर्जीपणामुळे देयके वेळेत टाकल्या गेली नाही, त्यातच जिल्हा झेडपीएफएमएस ही वित्त प्रणाली अचानक बंद पडल्यामुळे कोटींचे देयके रखडल्या गेली, तर अनेक कामे निधी परत गेल्या मुळे रद्द करण्यात आली, यामुळे जिल्हा परिषद सिंचन विभागाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या खात्याशी संबंधीत ही कामे असल्याने हा पैसा परत गेल्याने, कार्यकारी अभियंता यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले होते.






हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012 /49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK